मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्त:

म प्र

# हितगुज

अंक ९८ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ जून २०१४

वेबासाईट : www.marathepratishthan.org ✦ ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि कुलभगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार.

मार्च २०१४ च्या हितगुज अंकात, हितगुज चा १०० वा अंक कसा असावा? याविषयीची आपली मते, अभिप्राय जाणून घ्यायचे होते. जास्तीत जास्त कुलबांधवांनी आपले विचार कळवावेत म्हणून स्पर्धा ही घोषित करण्यात आली होती. पण खेदाने म्हणावेसे वाटते की कुलबांधवांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. अर्थात यालाही अपवाद आहेत. अगदीच निराशाजनक चित्र नाही. पुण्याचे श्री. श्रीराम व्यंकटेश मराठे, मालाडचे चित्रकार राजाभाऊ मराठे, ठाण्याच्या कुलभगिनी माहेरवाशिण चित्रकार कुमुद सुदाम डोके यांनी हितगुज १०० व्या अंकाविषयीचे मनोगत पत्र लिहून त्वरित कळविले आहे. हे स्वागतार्ह नक्कीच आहे. या अंकात तुम्हाला ते वाचायला निश्चितच आवडेल म्हणून प्रकाशित केले आहे.

दरवर्षी मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिके आपल्या परिवारातील यशस्वी विद्यार्थ्यांना देत असतात. १० वी १२ वी पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक स्पर्धा-परीक्षा त्याचप्रमाणे क्रीडा, संगीत, नाट्य इ. क्षेत्रात विशेष नैपुण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि कुलबांधवांना गुणवत्ता पारितोषिके दिली जातात. त्यांनी प्रतिष्ठानकडे अर्ज पाठवावे त्याचेही आवाहन या अंकात केले आहे. अर्ज पाठविण्याच्या पत्त्यावर व शेवटची तारीख ३० जुलैच्या आत लक्षात ठेवून वेळेवर अर्ज करावेत. मराठे प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारितोषिक वितरण समारंभ होईल.

संस्था देणग्यांवर चालते. अनेक वेगवेगळ्या पद्धतीने हितचिंतक कुलबांधव, माहेरवाशिणी मराठे प्रतिष्ठानला - हितगुज ला देणगी देत असतात. वाढदिवस, पुण्यस्मरण, स्मृतीप्रित्यर्थ, बारशानिमित्त, विवाहा-निमित्त आणि काही विशेष प्रसंगी देणगी आठवण ठेवून दिली जाते.

आता डिसेंबर २०१४ मध्ये हितगुजचा १०० वा अंक निघत आहे. माणसाला आपण जीवेत शरद: शतम् असा शुभाशिर्वाद देत असतो. आपल्या सर्व मराठे परिवाराच्या आशीर्वादाने, कृपाप्रसादाने हितगुजने शंभरी गाठली आहे. तेव्हा या १०० व्या शतक महोत्सवी अंकासाठी आधिकाधिक देणग्या कुलबांधवांनी द्याव्यात आणि हितगुजवर आणि प्रतिष्ठानवर असलेला लोभ वाढवावा ही विनंती.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**

(दि. १० मे २०१४)

● संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई-४०००३१ ●
दूरध्वनी : २४१५०८८९ ✦ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com

✦ अक्षरजुळणी : श्री. राजेंद्र एस. पेडणेकर, नालासोपारा - फोन : ९३२३३९१२६० ✦

Marathe Pratishthan

# CITATION

**Shri Madhusudan R. Khambete**

Shri M. R. Khambete did his initial schooling in Calcutta and Nagpur in Gujarati Medium and is fluent in Gujarati, Bengali, Hindi, English and Marathi language. He is qualified Electrical and Mechanical Engineer from Calcutta. He had an opportunity to get specialized training at England in field of 'Pneumatic & Vacuum Brake System'. He then started his own industry in Kolkatta and later shifted base to Thane, Near Mumbai, Maharashtra. He was aware of the numerous difficulties of Industries with an intention of mitigating the problems of the small entrepreneurs and encouraging them to grow, he formed an association of small scale entrepreneur's Namely Thane Small Scale Industries Association, TSSIA way back in 1974 with the help of a few likeminded entrepreneurs and today after 39 years it has under its fold more than 3000 members.

Shri. M. R. Khambete set up TSSIA for not only highlighting the problems faced by small scale entrepreneurs but to help solve them. With a futuristic vision in the year 1990, he founded Chamber of Small Industry Associations (COSIA) which represents MSME Sector as a National Chamber. He represented COSIA as Member of National Board for MSMEs under MSME Ministry, Government of India. And was also appointment on the Advisory Committee under MSMED Act, 2006.

He has also taken a lead in educating the members regarding the perils of WTO and has actively canvassed for levying anti-dumping duty on the affected products. Shri Khambete constituted an award TSSIA PMRY to encourage the nationalized bank branches for their excellent work, under Prime Minister Rojgar Yojana for self-employment in Thane District. He also initiated Shri. Aurobindo Permanent Industrial Exhibition hall where Manufacturers and Exporters of Quality Products display their products.

Shri. M. R. Khambete is thus not only conscious towards his duties to the entrepreneurs but also is eager to serve the common man. He has always put the nation in front of his personal needs and has organized collection drives and collected huge funds for the benefit of people affected with natural calamities.

He has served as President of Rotary Club of Thane. Life Member of Indo Japanese Association, Life Member of Indian Red Cross Society, Member of Zilla Udyog Mitra Committee, Govt. of Maharashtra, President of Jani Janardan Trust and Ex. Trustee of TSSIA BLOOD BANK. He has been awarded with Government Trophy for collection a record number of blood bottles during his tenure as Rotary President and has been instrumental in starting a blood bank at TSSIA.

He took a delegation of 24 entrepreneurs to Senegal in the year 1996. In today's scenario when China is posing a great threat to the Indian Industry, he has led a delegation of 15 entrepreneurs to China. They received an overwhelming response from the Chinese officials and many entrepreneurs are seriously thinking of joining hand with the Chinese Industry to expand their businesses. To unite MSMEs in India he had traveled every corner of India and conducted MSMEs meet in Western, Southern, Northern, Eastern, North Eastern region. Recognizing this contribution towards development of MSMEs and to generate an employment Thane Municipal Corporation had conferred him "THANE BHUSHAN" in 2002.

Shri. Jagdishprasad Jhabarmal Tibrewala University feels honored to award "D.Litt." degree (Honoris Causa) to Shri. M. R. Khambete for his outstanding contribution in the filed of small Scale Industrial growth, development of entrepreneurs and other social sectors in the 2nd Annual convocation held on 26th February 2014 at University Campus, Jhunjhunu in the esteemed Presence of His Excellency Shri Banwarilal Joshi, His Excellency Shri Jaganath Pahadia, His Excellency Dr. S. C. Jamir, Ayurvedacharya Vaidya Suresh Chaturvedi, Shri Bhalchandra Mungekar and Shri Surdasji Prabhu.

Chancellor

Marathe Pratishthan

# डी. लिट् - डॉक्टर ऑफ लेटर्स - आप्पा खांबेटे (पृ.६९६)




## आप्पा खांबेटे यांना डि.लिट प्रदान

ही ॲकॅडमिक डिग्री, पी.एच.डी. हून जास्त योग्यतेची डॉक्टर ऑफ सायन्सच्या बरोबरीची अशी सर्वत्र मानली जाते. उच्चतम कामगिरी, दीर्घकाळ सातत्याने करुन ज्यास समाजमान्यता, समाजास फायदा झालेला आहे, त्यांस ही सन्माननीय उपाधी दिली जाते.

श्री. मधुसुदन रामकृष्ण खांबेटे उर्फ आप्पा खांबेटे हे गेली पाच दशके व्यवसायात आहेत. व्यवसाय करताना अनेक अडचणींशी सामना सगळ्यांनाच करावा लागतो. इन्स्पेक्टरी, निरनिराळे सरकारी परवाने अशा सुमारे ६०,६५ नियमांची दखल घ्यावीच लागते. तेव्हा संघटित होऊन गेल्यासच कामे तडीस लागतात, हे ओळखून ठाणे जिल्ह्यापुरती, ठाणे लघु उद्योजक संघटना ची बांधणी केली. ती "टिसा" म्हणून ओळखली जाते. चार सभासद घेऊन स्वत:च्या घरीच १२ वर्षे चालवलेली ही संस्था आता सुमारे तीन हजार सभासदांची आहे. अशा सर्व राज्यातील संघटनांची एकजूट व्हावी, म्हणून २४ वर्षापूर्वी "कोसिआ" ही संस्था सुरु केली. त्यामुळे दिल्ली दरबारीही काही कमिटींवर प्रतिनिधित्व मिळून मान्यता मिळाली. सभासदांस जागतिक व्यावसायिक दृष्टी मिळावी, म्हणून चीन, सेनेगल... वगैरे दौरेही केले. यासाठी रात्रंदिवस तन,मन,धन देऊन संस्थेची भव्य वास्तू उभी केली. तेथे अनेक समाजोपयोगी सभा, चर्चासत्रे चालतात. थोडक्यात म्हणजे, "इवलेसे रोप लावियले द्वारी, तयाचा वेलू गेला गगनावरी" असेच झाले आहे. सर्व सभासदांस त्यांचा अभिमान आहे व ह्या सर्वांच्या सहकार्यानेच हे काम ८३ वर्षांच्या वयातही ते सहज करु शकतात.

या सर्वांची फलप्राप्ति म्हणजे डी.लिट् ही उपाधी जे जे टी युनिव्हर्सिटी, झुनझुनु विद्यानगरी, राजस्थान येथे देण्यात आली.

हरियाणा, ओरिसा येथील दोन राज्यपाल, आयुर्वेदाचार्य पद्मश्री सुरेश चतुर्वेदी, मुंबई युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरु श्री. भालचंद्र मुणगेकर आणि आप्पा या पाच जणांना २६ फेब्रुवारी २०१४ या दिवशी डी.लिट् देण्यात आली. आणि इतक्या वर्षांची तपस्या सफल संपूर्ण झाली.

Marathe Prakashan

# अविस्मरणीय सोहळा

सौ. पद्मजा मधुसुदन खांबेटे (पृ. ६९६)

डी.लिट् एक अत्युच्च पदवी आप्पांना मिळणार असे ऐकिवत होते, कुणकुण होती - परंतु प्रत्यक्ष फोन, पत्र असे आले की, खरे, म्हणून अगदी सर्वांना कळविले नव्हते.

अखेर पत्र, फोन सर्व इतकेच नाही तर मी, आप्पा आणि गिरीश यांची प्लेनची रिटर्न तिकीट ही आली. आणि नंतर तयारी सुरु झाली सर्वांत मनाची आधी-आप्पांच्या आणि माझ्या आजारपणानंतर एवढा लांबचा प्रवास अजिबात केलाच नव्हता. त्यामुळे पहिली सर्व औषधे - अर्निका मॅगफॉस, व्हस टॅक्स सिलिका, अमृतबिंदू, घरगुती सर्वोपयोगी मलम, पेनबाम, विमान प्रवासात कानात घालण्यासाठी कापूस, डिंक... वगैरे सितोपलादि चूर्ण घातलेले टॉनिक, त्रिफळा, अविपत्रिकर चूर्ण, इनो सुपारी बेहडा असे चूर्ण - गरम कपडे, गुडघ्यासाठी... तसेच कानटोपी, शाली - ५ दिवसांची तयारी.

तसेच प्लेनमध्ये खाण्यासाठी तिखट, गोड सॅण्डविचेस - कारण १५० चे सॅण्डविच आणि १२० ची कॉफी माझ्या घशाखाली खरंच उतरत नाही - सर्व जामनिमा झाला टॅक्सीही अगदी वेळेवर आली व आमच्या स्वाऱ्या रवाना झाल्या - सर्व सोपस्कार - पॅन, तिकिटे, चेक करुन बॅगा स्क्रिनिंग करुन झाल्या आणि माझी गाडी व्हीलचेअर माझ्या दिमतीस हजर झाली - पर्सेस, हॅण्डबॅग आणि मी असे सर्वच आरपार तपासणी झाली आणि पुन्हा व्हीलचेअरवर बसून प्रवास सुरु झाला. मी व्हीलचेअरवर असल्यामुळे कोठेही क्यू मध्ये मलाच काय माझ्याबरोबरच्या दोघांनाही पटकन प्रवेश अगदी व्हीआयपी ट्रीटमेंट जयपूर एअरपोर्टही मोठे-दोन्ही एअरपोर्टवर भरपूर चालावे लागते - परंतु मी आपली आरामात एअरपोर्टवर मधु गुप्ता आल्याच होत्या नंतर आमचा झुनझुनुचा प्रवास सुरु झाला. वाटेत झंकार हॉटेलमध्ये मेथी पराठा, आलू पराठा, मिक्स भजी-बटाटा, कांदा, पनीर भजी, चहा, दूध वगैरे झाले. एक दुर्मिळ वनस्पती मिळाली बराच अंधार झाला. साडे चार तासानंतर मुक्कामी पोहेचलो - जेवण सुंदर, गरम व आग्रहाचे व्हीआयपी - खास जागेत होते.

आमची खोली ग्राऊंड फ्लोअरवर व प्रशस्त होती. साधारणपणे १२ - १६ अशी आणि उंच छत - सुंदर पडदे - दोन बेड - डबल पेक्षा थोडा लहान आकार पण सिंगलपेक्षा मोठा असा प्रशस्त - गाद्या, उशा एकदम स्वच्छ, रजया - प्रशस्त मोठा सोफा, दोन टेबल, खुर्च्या मोठ्या सेंटर टेबल - मला तर ते सरकवताहि येत नसे. एके ठिकाणी बाथरुम वॉश बेसिन व लागून दुसरे ठिकाणी वॉश बेसिन - टॉयलेट एकदम स्वच्छ - प्रत्येकास १० अत्यावश्यक वस्तूंचे किट जर बघण्याजोगेच आहे. सर्वांत सुखद म्हणजे इलेक्ट्रीक केटल झटकन पाणी गरम होई, त्यांत टी बॅग वा लेमन बॅग टाकली की मस्त वाटे.

आम्हांला तिघांनाही सुंदर अष्टकोनी आकाराचे जाळीदार उत्तम कापडाचे फळांचे बटवे दिले. फळांचे बटवे म्हणजे बटव्याप्रमाणे त्याची रचना होती. दोन्ही टोकांना उत्तम छोटे मोर लावले होते. त्यात नेहमीच्या सफरचंदाबरोबर, हिरवी सफरचंद, चिकू, केळी, संत्र्याबरोबरच छोटी अगदी मोठ्या आवळ्याएवढी "कमला निंबू" ही संत्री। आजकालचे जास्तच प्रसिद्धी मिळालेले "किवी" चेरी प्रमाणे पण सुपारी एवढे मोठे काळे प्लम आणि एक खूप केसाळ आतमध्ये मोठी बी व गर ताडगोळ्याप्रमाणे असलेले एक निनावी अगम्य फळ बरेच होते. सगळ्यात आश्चर्य म्हणजे सुंदर मोठा पेपर नॅपकीन अन् उत्तम सुरीसुद्धा त्यांत ठेवली होती. भेटी कशा पद्धतीने द्यावी त्याचा उत्तम नमुनाच. किवी, प्लम आणले. घरी ते फारसे कोणी खाईना म्हणून सर्वांचे कॉकटेल केले. त्यामुळे ते सर्वांच्या घशाखाली उतरले.

कॅन्टीनमध्ये एकावेळी जवळजवळ २०० जणांची बसून जेवणाची व्यवस्था - भिंतीवर जेवणासंबंधी आहार विहाराची उपयुक्त माहिती - फार सुंदर फ्रेम्स होत्या. रोज निराळा नाश्ता, जेवणाचा मेनु, गरम गरम टम्म फुगलेले अगदी तव्यावरचे फुलके - सुरेख भाजी पालकची परतून भाजी तर एवढी रूचकर तसेच समोसे, कचोरी ही अफलातून फक्त एकच - म्हणजे आमच्या खोलीपासून कॅन्टिन - फर्लांगभर दूर - कित्येक दिवसांत मी एवढी चालले नसेन - सकाळी दूध, चहाची फेरी, नंतर ब्रेकफास्टची फेरी, त्यानंतर जेवणाची फेरी, दुपारच्या चहाची फेरी, रात्रीच्या जेवणाची वेळ - त्यांनी खोलीवर आणून देतो असेही सांगितले पण ते आम्हांलाच पटले नाही तेथे चार लोकांचे बोलणे छान वाटे, ओळखी होत - हात धुवायला गरम पाणी - मस्त सर्व कडे सजावट चालू होती संपुर्ण मार्गावर खांब, कमानी, फुले, तोरणे.... निळे, पांढरे पडदे ते पडदे वाटतच नव्हते. सुरेख दुमड - घट्ट ताणून बसविले. पाण्यात कमळे, कारंजे दिवे रोषणाई, अक्षरश: सर्व दूर रेड कार्पेट, बॅन्ड, स्वर्ग अवतरल्यासारखे रात्री तर फार सुंदर दिसे. भव्य हॉल, बॉईज हॉस्टेल, गर्ल्स हॉस्टेल प्रत्येक फॅकल्टीला निराळी बिल्डींग - मेकॅनिकल, इलेक्ट्रकिल...

मोठे लॉन, झोपाळा सर्वच भव्य झुनझुनमधील राजस्थानी रंगीबेरंगी रिक्षांत बसावयाची रचना टांग्यासारखी तीन जणांच्या पाठीला पाठ लावून आणखी तीन जणांची छान सोय. एकूण आकारात फरक नाही. आपल्याकडे - झाल्यास रहदारीवरील ताण थोडा कमी होईल. दुसरे दिवशी झुनझुनुमध्ये "राणीसती मंदिर" आहे. ते ही प्रचंड सुंदर भव्य आजूबाजूस कोरलेले वर छतही सुंदर चितारलेले - अभिमन्यूची उत्तरा हिच्या प्रित्यर्थ बांधलेले आहे - गंमत म्हणजे तिथे मूर्ति नाही. त्याऐवजी त्रिशुल, असा त्यामध्येच चेहरा बघावयाचा. चौकामध्ये पाठीला पाठ लावलेली दोन गणेशांची मूर्ती - गणपतीची पाठ बघू नये म्हणतात. म्हणून असे दोन सुरेख संगमरवरची मूर्ति - उत्तम महाप्रसाद ४० रुपयांत मिळतो. रहाण्याची ही उत्तम व्यवस्था आहे. फक्त ५ वर्षीय या बाळ युर्निव्हरसिटीने फारच सर्व सुंदर आयोजित केले होते. तिसरे दिवशी - मुख्य समारंभ... सर्वांची लगबग अगदी पहाण्याजोगी असंख्य लोक अक्षरश: चोवीस तास राबत होते. सर्व तयारीवर खुद्द चॅन्सेलरची बारीक नजर होती. सर्व तयारी चकित होण्याजोगेच सर्व काही हरियाणाचे राज्यपाल श्री. जगन्नाथ पहाडिया साहेब, ओरिसाचे राज्यपाल एस. सी. जमीरसाहेब, पद्मश्री आर्युवेदाचार्य श्री. सतिश चर्तुवेदी माजी कुलगुरु मुंबई श्री. भालचंद्र मुणगेकर आणि आप्पा अशांना डी. लिट पदवी मिळणार होती.

जे जे टी यु चे बोधवाक्य आहे "थिंक पीएचडी". तेथे पी एच डी करणाऱ्यापैकी ६०



Marathe Pratishthan

टक्के महाराष्ट्रातून विविध वयोगटातील - युवकांपासून वृद्धांपर्यंत विद्यार्थी म्हणून होते. मला एकाने विचारले तुम्ही पी एच डी करावयास आलात का? म्हटले नाही - अप्पांना डी.लिट मिळणार आहे. तेव्हां त्याने विचारले हे कोणत्या राज्याचे गर्व्हनर आहेत? कारण २, ३ गर्व्हनर डी. लिट मिळणाऱ्यांत होते ना? आहे की नाही गंमत.

सर्व ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांचे निळे डगले होते - डीन लोकांचे पिवळसर रंगाचे व डि लीटचे क्रिमिश रंगाचे डगले राजस्थानी फेटा वगैरे मजेदार थाटमाट होता (खरे म्हणजे सगळे थोडेसे जोकर टाईप दिसत होते.)

सर्व फ्रेम्स करूनच मानपत्र, सर्वोच्च पदवी वगैरे दिले आणि एक अनोखी भेट म्हणजे कामधेनू भेट. मागे एकदा गणपती नंतर सरस्वती मूर्ती आमच्या कट्याच्या मुलींनी लक्ष्मी मूर्ती दिली आणि आता कामधेनू. सर्व इच्छापूर्ती चला आता सर्वप्राप्ती झाली नंतर सर्वांची भाषणे झाली. आप्पांचे सर्वांत शेवटी ६, ७ मिनिटांचे छोटेसे भाषण झाले म्हणून सर्वांना... आधीची खरोखरच जरा कंटाळवाणी भाषणे झाली. माझ्या शेजारील बाई तर खरोखरच घोरत होती. नंतर बाकी सर्वांचा पदवीदान समारंभ - नाच गाणी धमाल, चॅन्सेलर... सर्वच जण धम्माल नाचत होते.

संध्याकाळी बाहेर पार्टी झाली. "कांजी वडा प्रकार वाचला, ऐकला होता पण प्रथमच खाल्ला, छान निराळी चव होती. इतरही बरेच प्रकार होते. खाण्याची चंगळ सततच २७ तारखेला महाशिवरात्र जवळच मोठे शिवमंदिर होते तेथे वैद्यराज मी, गिरीश गेलो - स्वच्छ सुंदर देऊळ सर्वच देवांच्या मुर्ति तेथे आहेत तेथे अभिषेक, पूजा केली. आधीच पिंडीवर काळ्या-जांभळ्या धोत्र्याचे फूल दुर्मिळ वाहिलेले होते. म्हणून शोध लावला ते झाड पाहिले त्यावरची काही फळे आणली आहेत बघूया झाडे होतील का? दुपारी एक शंभर सव्वाशे फूट उंच शिवमूर्ती चेहऱ्यावर आकर्षक भाव - अशी पाहिली. तसेच मूर्तीच्या डाव्या बाजूस अष्टविनायकची सुरेख शिल्पे, भैरव व हनुमान अशा मूर्ती होत्या. मध्यभागी नवग्रहांच्या मूर्ती होत्या सर्व देखण्या, स्वच्छ उजव्या बाजूस १२ ज्योर्तिलिंग यात्रा करुन आल्यावर "अतिरुद्र" केला होता त्या १२ दिवसांची आठवण झाली.

येथून जातानाच ठरविले होते की, अगदी सर्वांसाठी काही ना काही घेऊन यायचे म्हणून रिकाम्या पिशव्या ही भरपूर नेल्या - परंतु झुनझुनलाही बाजारात जावयास जमले नाही तर जयपूरला काय जाणार? २७ ला तर मळभ येऊन सोसाट्याचे वारे, वादळ, गारांचा पाऊस, महाप्रचंड थंडी-दोन रजया शाल घेऊन हिटर सुरु करून स्वेटर घालून झोपले तरी थंडी वाजतच होती. नानांचे वाक्य सारखे आठवे, आपली अंगातील रग कमी झाली की "रग" पांघारायला हवाच. २८ ला सकाळी ६.००, ६.३० ला निघायचे ठरविले कधी नाही ते अंघोळ न करताच जाण्याचे ठरवित होतो तेवढ्यांत लाईटच गेले त्यामुळे पाणीही गरम करता येईना व पाण्याचा जगही कामी येईना त्यामुळे छोटी बॅटरी नेली होती तिच्या जीवावर सर्व काही आवरले व ६ वाजताच बाहेर आले तो ज्यांनी टायिमग ठरवले त्या गाऊनमध्येच! शेवटी इंडियन टाईमप्रमाणे ८.३० वाजता निघालो लवकर निघून थोडा वेळ जयपूरमध्ये शॉपिंग करण्याचे ठरविले होते त्यावर पावसाने ही अक्षरश: पाणी फिरविले. बॅगा ओल्या झाल्या त्यात मध्येच ड्रायव्हर बदलला. त्यांत वेळ गेला. जयपूरला जे जे टी यु च्या लोकांनीच थोडी मिठाई दिली - तेवढीच. आमच्या दोन गाड्या होत्या. आम्ही एका गाडीत तर आमचे काही सामान दुसऱ्या गाडीत त्या गाडीचा ड्रायव्हर आपल्याकडील त्याला काही माहिती नाही. मध्येच पोलिसांनी गाडी अडविली काहीतरी झाले इकडे आम्ही एअरपोर्टवर आलो व आमचे चेकिंग सर्व सोपस्कार झाले पण दुसऱ्या गाडीचा पत्ताच नाही. अप्पा म्हणाले आपण आहे तेवढे सामान घेऊन निघून जाऊया. काय होईल ते होईल, दोन मोठ्या बॅगा त्यांच्याकडे. नंतर ती मंडळी आली परंतु त्यांनी फोन वगैरे न केल्यामुळे आम्हांला काय झाले ते माहितच नव्हते. बॅगा पुन्हा घेता येत नव्हत्या. आमची तिकिटे ही वेगवेगळ्या कंपनीची. त्यामध्ये त्यांना बॅगासाठी जास्त पैसे मोजावे लागून बॅगा आणाव्या लागल्या आमचा ड्रायव्हर वेळीच आला पण आम्ही त्यांची - बॅगांची वाट बघत होतो. सांताक्रुझला पंडित जसराज एकटेच बसलेले पाहिले. कोणाची तरी वाट पहात होते. अप्पा त्यांच्याजवळ गेले. बोलता बोलता ते म्हणाले आपली येथील युनिर्व्हसिटी मलाही डि लीट देणार असे ऐकिवात आहे परंतु... अशी थोडीशी खंत त्यांनी व्यक्त केली.

त्यांत दोन तास उशीर झाला - आधीच खराब हवामानामुळे निघण्यास उशीर मधे मधे खराब हवामानामुळे खड्ड्यातून गाडी जाताना जसे होते तसे विमानात होत होते ट्रॉलीवरुन वस्तू झटाझट उचलल्या - सर्वांना पट्टे आवळावयास सांगितले. असे दोनदा झाले. कानात आवाज येताच कानात कापूस घातले.

शिवरात्रीच्या दिवशी गेलो होतो तेथे माझ्या डाव्या पायाच्या अंघठ्याला ठेच लागली - गिरीशने सावरले म्हणून पण अंगठा अजुनही दुखतोच आहे त्यातच त्याच दिवशी अप्पाही पडले हातावर जोर आल्यामुळे हात तर निळे काळे झाले पण स्वत: उठू शकले. फॅक्चर झाले नाही. अशी आमची ट्रीप थोडीशी रडत कढत पण जास्त गाणे म्हणत अशी अविस्मरणीय झाली म्हणून आत्ता आठवले तसे लिहिले आहे. कारण पुन्हा काय आठवेल. किती आठवेल सांगता येत नाही कारण "मरण" जवळ आले की बहुतांश विस्मरण होते नाही का? पृथ्वीतलावरुन डि.लिट होण्याआधी डि लिट ही सर्वोच्च पदवी मिळाली हेच थोर भाग्याचे मानायचे.

राजस्थानातील राजेशाही आदरातिथ्याच्या सुरेख आठवणी भरपूर घेऊन आलो. कोठेही गेले तर माझी खरेदी ही भरपूर परंतु पूर्णत: एक पैशाचीही खरेदी न करता रिकाम्या पिशव्या घेऊन परत येणारी ही ट्रीप खरचं अविस्मरणीय. जाता-येता आमचा नेहमीचा ड्रायव्हर महमूदमुळे आणखीच सुखकर-

पीटीआयच्या लोकांनी बातमी दिली आहे - की महाराष्ट्रात कदर केली नाही तरी बाहेरच्या लोकांनी आप्पांच्या कामाची बूज राखली आहे.

**सौ. पद्मजा मधुसुदन खांबेटे**

(पृ.क्र.६९६)

# कौशल्य निवेदनाचे...

- भाऊ मराठे (पृ.क्र. ५०७)

निरनिराळ्या प्रकाराचे गाण्याचे कार्यक्रम, सत्कार समारंभ, प्रकाशन समारंभ, काव्यवाचन, शोकसभा असे नाना तऱ्हेचे कार्यक्रम होत असतात. आज कुठल्याही समारंभात "निवेदक" किंवा "सूत्रसंचालक" किंवा "मास्टर ऑफ सेरिमनी" हा एक अविभाज्य घटक झालेला आहे.

ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी कविवर्य विंदा करंदीकरांच्या कवितेतबदल करुन म्हणायचं झालं तर :

बोलणाऱ्याने बोलत जावे
ऐकणाऱ्याने ऐकत जावे
कधी कधी बोलणाऱ्याने
ऐकणाऱ्यांचे कान घ्यावे.

"ऐकणाऱ्यांचे कान घेऊन बोलणे" ही उत्तम निवेदकाची पहिली अट आहे. "तपश्चर्या" म्हटलं की लगेच "उग्र" हे विशेषण आठवतं. त्याचप्रमाणे "तर्क" म्हटलं की आपल्याला "तर्ककर्कश" हा शब्द आठवतो. का कुणास ठाऊक, आपण "तर्का"चा संबंध "कर्कश" पणाशी जोडला आहे. ज्ञानाचा किंवा व्यासंगाचा मार्ग भयंकर असतो. त्या मार्गावर प्रचंड दगडधोंडे, काटेकुटे असतात. हा एक मोठा गैरसमज आहे. ज्ञानमार्ग खडतर आहेच. पण कोणाला खडतर ? त्या खडतरपणातली मजा ज्याला कळली नाही त्याला ! अमेरिकेतल्या प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीच्या कुलगुरुने म्हटलं आहे. "AQUIRING KNOWLEDGE SHOULD BE FUN!"

AQUIRING KNOWLEDGE ही कधीही न थांबणारी क्रिया आहे. उत्तम निवेदकाने खूप वाचलं पाहिजे. वृत्तपत्रातील "निविदा सूचनां"पासून काहीही वाचावं. शंभर वाईट पुस्तकं वाचली तर एखादं चांगलं पुस्तक हातात येतं आणि ते पुस्तक वाचनाची दिशा ठरवतं. चांगलं पुस्तक हातात आल्यावर त्यातले संदर्भ टिपून ठेवावे लागतात. निरनिराळ्या लेखकांची भाषा जिभेवर चढावी लागते. म्हणजे भाषेचा अभ्यास आला. वाचनाचं महत्त्व सांगताना आचार्य अत्र्यांनी म्हटलं आहे. "मी रोज वाचतो म्हणून जीवनात वाचतो!" हे वाक्य लक्षात ठेवायला पाहिजे.

निवेदक ह्या बहुश्रुत असावा लागतो. "वेलरेड" असणं वेगळं आणि "बहुश्रुत" असणं वेगळं. लिखित भाषा आणि बोली भाषा यात फरक आहे. आज सुदैवाने पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, शंकर पाटील यांचं कथाकथन - पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे, राम शेवाळकर, शिवाजीराव भोसले, बाबासाहेब पुरंदरे, यशवंत पाठक यांची भाषणं - वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, पु. ल. देशपांडे, सुनीता देशपांडे, यांचं काव्यवाचन - ध्वनिफितीवर उपलब्ध आहे. हे सगळं ऐकलं पाहिजे. ही सगळी मोठी मंडळी शब्दावर कुठे जोर देतात. कुठे पॉझ घेतात, कुठे वरच्यावर शब्द सोडून देतात - हे सगळं बारकाईने ऐकलं पाहिजे.

उत्तम बोलण्याच्या संदर्भात आचार्य अत्र्यांची "DEMAND" फारच मोठी आहे. त्यांनी एका ठिकाणी म्हटलं आहे, "बोलणाऱ्याच्या वाक्यातला पूर्णविराम श्रोत्यांना ऐकायला गेला पाहिजे. इथे वाक्य संपलं आणि आता नवीन वाक्य सुरु होणार आहे. हे श्रोत्यांना जाणवलं पाहिजे!" अशा तऱ्हेने बोलणं फार कठीण आहे. शब्दांच्या अर्थाच्या-वाक्याच्या लयीच्या हुकुमतीवर निवेदकाचा सर्वात अधिक कटाक्ष असावा लागतो. ज्याला उत्तम निवेदक व्हायचं आहे किंवा उत्तम नट व्हायचं आहे त्याला कविता उत्तम वाचता आलीच पाहिजे. कवितेची जशी लय असते तशीच गद्य बोलण्याचीही लय सांभाळावी लागते. या सगळ्या जोडीला उत्तम पाठांतराची अत्यंत आवश्यकता असते. उत्तम पाठांतर हे खिशातल्या चिल्लरसारखं असतं. केव्हाही दाणकन् वापरावं. कुठल्याही प्रकारच्या गोळ्या खाऊन स्मरणशक्ती जाणीवपूर्वक वाढवावी लागते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे सुस्पष्ट बोलणं. गाण्यात लयींच्या अंगाने सुधीर फडक्यांचे उच्चार आणि गद्य शब्दांचे प्रा. अशोक रानड्यांचे उच्चार ऐकल्यावर हे प्रकरण किती कठीण आहे ते कळतं. श्रोत्यांना प्रत्येक शब्द स्वच्छ ऐकायला गेला पाहिजे. MICROPHONE IS A DEMON THAT EAT THE WORDS असं म्हटलेलं आहे. निवेदकाला मायक्रोफोनच्या तंत्राने बोलण्याचा सराव करावा लागतो. मायक्रोफोन कसा धरावा, तोंडापासून किती लांब असावा, "प फ ब भ" या बाराखड्यातल्या अक्षरांनी सुरु होणाऱ्या शब्दांच्या उच्चारण्यात BLAST येऊ नये याची काळजी कशी घ्यावी, बोलताना आवाजाची कुठलीपट्टी लावावी - या सगळ्या तंत्रांचा अभ्यास करावा लागतो. प्रत्येक निवेदकाला उत्तम आवाज लाभतोच असं नाही. पण निसर्गाने बहाल केलेला आवाज उत्तमरित्या वापरता आला पाहिजे.

निवेदकाला इतरांकडून खूप शिकण्यासारखं असतं. एखाद्या कार्यक्रमाचं प्रास्ताविक कसं करु नये याचं प्रात्याक्षिक मला व. पु. काळ्यांच्या कथाकथनाच्या एका कार्यक्रमात ऐकायला मिळालं. प्रास्ताविक करणारा भिडू सांगत होता: "आजचे कथाकथनकार आहेत वपु!" मी त्यांना वसंत पुरुषोत्तम काळे या संपूर्ण नावाने ओळखतो व. पु. काळे या नावातला पु फार महत्त्वाचा आहे. हा जो "पु" आहे तो नेपथ्यकार आहे हा जो "पु" आहे त्याने वसंतरावांवर लेखनाचे संस्कार केले. स्वत: काळेसुद्धा

आपल्या नावातला "पु" महत्त्वाचा मानतात! हे सगळं "पु" पुराण ऐकत असताना व.पु.काळे अक्षरश: हैराण झालेले मी पाहत होतो. एक वेळ माशी हाकलली असती तर ती उडाली असती, पण हा जिद्दू "पु" सोडायला तयार नव्हता.

काही प्रास्ताविक करणारे खुपे रुस्तम असतात, हरहुन्नरी असतात. एका कार्यक्रमात सदरा-लेंगा घातलेल्या मवाळाच्या मिहूने मोजक्या शब्दात सुंदर प्रास्ताविक केलं. आणि जायला निघणार इतक्यात तो म्हणाला: "आज कार्यक्रमाला बरीच लहान मुलं आलेली दिसताहेत. ती जर रडू लागली तर त्यांच्या पालकांनी त्यांना नैसर्गिकरित्या शांत करावं. शांत करावं म्हणजे मुलांच्या वडिलांनी मुलाला घेऊन बाहेर जावं!" सभागृहात एकच हशा उडाला.

वक्त्याला कार्यक्रमाच्या सुरुवातीला वातावरणनिर्मिती करावी लागते. निवेदकाला - वक्त्याला इथे हजरजबाबीपणाची फार आवश्यकता असते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या आंदोलनाच्या वेळी गिरगावातल्या मायवाडीसमोर आचार्य अत्र्यांची प्रचारसभा होती. आचार्य अत्र्यांना सभेला यायला दोन तास उशीर झालेला होता. मायवाडीसमोरचा रस्ता माणसांनी फुलून गेलेला. अस्वस्थ झालेला जनसमुदाय. आचार्य अत्रे व्यासपीठावर आले आणि म्हणाले: "मला यायला दोन तास उशीर झाला आहे याची मला जाणीव आहे. पण मायवाडीमध्ये वेळच्यावेळी यायला मी काय बैल आहे का?" (त्यावेळेस काँग्रेसची निशाणी बैलजोडी होती) झालेला उशीर विसरुन सभा कचकन् ताब्यात आली. अशा निरनिराळ्या प्रसंगांतून निवेदक शिकत असतो.

निवेदकाचं मन शांत हवं. त्याच्यावर ताण नको. मन मोकळं नाही म्हणजे हालचाली मोकळ्या नाहीत. आवाज मोकळा नाही. "निश्चल" मन ही अभिनयाला-बोलण्याला अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. मांजर कसं स्वस्थ पडलेलं असतं, पण उंदीर दिसला की सारी शक्ति एकवटून टुणकन उडी मारतं, त्याप्रमाणे निवेदकाच्या बोलण्यात एक प्रकारची सावधानता हवी. त्याकरिता निवेदक संपूर्णपणे RELAXED मनाने अगदी हलक्या फुलासारखा झाला पाहिजे. शरीरातले स्नायू न् स्नायू सैल हवेत. त्याच्यावर कसलाही मानसिक ताण नको. मनाला धास्तीचा स्पर्श झाला की कारभार आटोपलाच. म्हणून निवेदक अतिशय ORGANISED असावा लागतो. काहीही पूर्वतयारी न करता व्यासपीठावर चढलं की, एक गोष्ट हमखास मिळते तिचं नाव "फजिती!" पूर्व तयारी उत्तम असली की भयमंच म्हणतात ते निवेदकाला राहत नाही.

आजचा जमाना हा INSTANT चा आहे CONSTANT चा नाही. आज इथे कुणाला थांबायला सवड नाही. धावायला बळ नाही. काल "आ" करायला शिकला की उद्या गाण्याचा कार्यक्रम हवा. प्रसिद्धी हवी. दूरदर्शनच्या टॉवरला हजार फूट उंची आहे. भरपूर झाले! कर्तृत्व-व्यासंग या बाबतीत उंची गाठली नाही तरी चालेल असा INSTANT च्या जमान्यातला विचार आहे. असा विचार करुन कसं चालेल? सुगम संगीताचा "शब्द" हा प्राण आहे. त्याचप्रमाणे निवेदनाचासुद्धा प्राण "शब्द"च आहे. ज्ञानेश्वरांनी म्हटलंच आहे.

जैसे बिंब बचकेएवढे। परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडे।

शब्दाची व्याप्ती तेणेपाडे अनुभवावी।।

- सूर्यबिंब बचकेएवढचं असतं. पण त्याच्या प्रकाशाला त्रैलोक्यही तोकडं पडतं. तसंच शब्द आकाराने लहान असला तरी त्याच्या अर्थाला सीमा नसतात. म्हणून निवेदकाला त्याची भूमिका समजून घ्यायला लागते. त्या भूमिकेला घोडा समजून तीवर स्वार व्हायचा प्रयत्न करावा लागतो. म्हणजे तो घोडा सावकाश कधी चालवावा दौडवावा कधी - हे सगळं त्यावेळी कळतं. थर्मामीटरला ताप येऊन चालत नाही. त्याने दुसऱ्याचा ताप दाखवायचा असतो. निवेदकाला शब्द कसा फेकायचा आहे - किती दूरवर फेकू शकतो - एक शब्द आल्यानंतर तोच शब्द पन्नास तऱ्हेने फेकू शकतो का याचा विचार करावा लागतो.

शाणी माझी शोनुकली ती
कुणा कडे ग पहात होती?
तो रविकर का गोजिरवाणा
आवडला अमुच्या राणींना?

- हे किती तऱ्हेने म्हणून दाखवता येईल याचा निवेदकाला विचार करावा लागतो.

हे भांडवल तसं स्फोटक आहे. जरा इकडला स्वर तिकडे झाला की गोंधळ होतो. शब्दातील ऱ्हस्व:दीर्घ उच्चारांचा तोल सांभाळावा लागतो. म्हणून मातृभाषेचा अभ्यास आला. अशा वेळी "ONE WHO SPEAKS MOTHER TONGUE WELL, CAN SPEAK ANY LANGUAGE IN THE WORLD BETTER!" हे सर विन्स्टन चर्चिलचं वाक्य लक्षात ठेवलं पाहिजे. त्याच्याच बरोबर "देहबोली" तितकीच महत्त्वाची आहे. बोलत असताना चेहऱ्यावरचे हावभाव: हाताची हालचाल : मांडी घालून बसण्याची पद्धत (SITTING POSTURE) यामध्ये ताळमेळ पाहिजे.

निवेदकाला फार बारकाईने "ऐकायला" शिकावं लागतं. ज्याला निवेदक व्हायचं आहे त्याने संगीतातलंच नव्हे तर गद्यातलंसुद्धा सामर्थ्य [illegible]. आहे ते ऐकायला शिकलं पाहिजे. जी भाषा किंवा बोली आपण वापरणार आहोत, ती त्याला पक्की ठाऊक असायला पाहिजे. म्हणून निवेदकाला बोलणं छापील वाक्ये पाठ केल्यासारखं बोलून चालत नाही. अशा

तऱ्हेने बोललं तर निवेदकाचा "सखाराम गटणे" होतो. ते बोलणं सहज वाटलं पाहिजे. पण सहज-सहजतेत देखील खूप फरक असतो. कुत्रही सहज चालतं आणि वाघही सहजच चालतो. पण वाघाच्या चालीत एक सहज डौल असतो. अशी सहजता निवेदकाच्या बोलण्यात पाहिजे. निवेदकाला आपल्या बोलण्यातून कार्यक्रमाच्या पहिल्या तीन मिनिटांत श्रोत्यांना विश्वासात घेता आलं पाहिजे. "हा निवेदक माझ्या मनातलं बोलतो आहे. - माझा प्रतिनिधी हा निवेदक आहे". असा विश्वास कार्यक्रमाच्या शेवटपर्यंत निवेदकाने श्रोत्यांच्या मनात निर्माण करावा लागतो. गाण्यात टाळीची तान असते तशी निवेदनातही काही टाळीची वाक्यं असतात. मग तसली वाक्यं म्हणताना टाळीसाठी धडपड सुरु होते. लोकांना काही पटलं-रुचलं की लोक टाळी देतात हे खरं आहे. म्हणून ती टाळी, लोकांकडून थकलेली बाकी वसूल करणाऱ्या पठाणासारखी वसूल करायची नसते. निवेदकांच्या बोलण्यात अशी डौलदार सहजता पाहिजे की ती टाळी लोकांकडून उत्स्फूर्तपणे आली पाहिजे.

निवेदकाला आणखी एक भान ठेवावं लागतं ते म्हणजे बोलण्यातलं नेमकेपण. जलतरंगाच्या एखाद्या पात्रातील पाणी कमी-ज़ास्त झालं की सूर जसा बिघडतो. त्याचप्रमाणे बोलण्यातला नेमकेपणा नसणारा निवेदक गाण्याच्या कार्यक्रमाचा सूर बिघडवतो. गाण्यात जसे सारेगमपधनी" हे सात स्वर आहेत तसाच निवेदनाला "नि" हा अत्यंत महत्त्वाचा सूर आहे. हा "नि" नसेल तर निवेदकाच्या निवेदनात फक्त "वेदना" उरतात. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे निवेदक हा गाण्याच्या कार्यक्रमातील एक अविभाज्य भाग आहे असं निवेदकाने मानलं पाहिजे. एखाद्या गाण्याचं निवेदन करुन झाल्यावर सादर होण्याऱ्या गाण्याशी आपला काही संबंध नाही, असा चेहरा करुन काही निवेदक बसतात. गायक, वादक, निवेदक यांनी मिळून उभी करायची ही कला आहे याचं भान ठेवावं लागतं.

प्रत्येक निवेदक हा "AMATEUR" असावा लागतो. "AMATEUR" चा एक अर्थ प्रेमिक असाही आहे. बोलण्याची कला ही त्याची प्रेयसी आहे. म्हणून कुठलीही कला यायला आधी तिच्या प्रेमात पडावं लागतं. तो प्रेमाचा झरा कधी कधी गुप्त असतो. कलेवर मुख्य म्हणजे उपजत प्रेम असावं लागतं. खऱ्या प्रेमाविषयी बोलताना कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांनी म्हटलं आहे. "खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनी!" असे लोभरहित निर्मळ प्रेम हवं. प्रेयसीला भेटायचा संकेत ठरला की प्रियकर कसा मोहरुन आलेला असतो. तसा गाण्याचा कार्यक्रम ठरला म्हणजे लग्नाची तिथी ठरल्यासारखी निवेदकाची तहानभूक विसरावी लागते. स्टॅनिस्लाव्हस्कीने म्हटल्याप्रमाणे : "LOVE THE ART IN YOURSELF AND NOT YOURSELF IN ART - FOR THIS LEADS TO SUCCESS IN YOUR WORK"

एखाद्या गाण्याच्या कार्यक्रमाला ज्या प्रकारच्या माणसांची गर्दी जमते त्यावर सादर होणाऱ्या कार्यक्रमाचा दर्जा ठरवता येतो. वैयक्तिक क्षेत्रात स्वत:ची उंची स्थापन केलेली मंडळी जेव्हा एकत्र येतात तेव्हा प्रश्न पडतो की, या सर्वांना एकत्र धरून ठेवणारा असा कोणता धागा असू शकतो? आणि वैयक्तिक क्षेत्रात स्वत:ची उंची स्थापन न केलेले श्रोते एकत्र येतात तेव्हाही हाच प्रश्न पडतो. ग. दि. माडगूळकरांच्या भाषेत सांगायचं तर ही सगळी मंडळी अगदीच "दु:खाचे धागे" नसले तरी काही ना काही विवंचनेचे : दगदगीचे : धावपळीचे धागे विसरण्यासाठी "एका सुखाच्या धाग्या" साठी जमलेले असतात. हा एक धागा सुखाचा म्हणजेच "एक धागा सुरांचा" असा असतो.

पु. ल. देखपांडे, प्रा. अशोक रानडे, प्रा. राम शेवाळकर, प्रा. शंकर वैद्य, सुधीर मोघे, सुधीर गाडगीळ, संजय उपाध्ये, मंगला खाडिलकर अशा मान्यवरांनी तनमन एकत्र करुन विविध कार्यक्रमांचं उत्कृष्ट निवेदन केलं, त्याबद्दलची कृतज्ञता आपल्या मनात असली पाहिजे. उत्कृष्ट निवेदनाचा उदय आपल्यापासूनच सुरु झाला आहे. असं कुणी समजू नये. हा एक प्रवाह आहे, तो थांबू शकत नाही.

**श्री. सदानंद विष्णु तथा भाऊ मराठे**
नीलमणी, शिवाजी पार्क, दादर, मुंबई
दूरध्वनी : ९८२१३६६२५२
०२२-२४४४८६४८

**"हितगुज" साठी जाहिराती द्याव्यात**

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृत महोत्सव, सहस्त्रचंद्र दर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन "हितगुज"ला सहकार्य करावे.

पाव पान रु. ६००/- अर्धे पान रु. १,२००/- पूर्णपान रु. २,५००/-

रक्कम "मराठे प्रतिष्ठान" नावाने संपादिकेच्या पत्यावर चेकने पाठवावी.



Marathe Pratishthan

# "हितगुज" शतक महोत्सवी अंकाची संकल्पना

चित्रकार - राजा मराठे (पृ.क्र. २३५)

शतक महोत्सवी अंकाचे रेखाटन करताना समोर ठेवलेले प्रसंग, घटना व त्या अनुषंगाने वाचकाना केलेले आवाहन असा आहे. मुख्य कल्पना कार्यकर्त्यांना पसंत पडली तर सध्या कार्यरत असलेल्या गोष्टींची मांडणी करताना आपणांस सोईचे व्हावे एवढाच या रेखाटना मागील उद्देश आहे.

१) अर्पण पत्रिका... कोणतेही कार्य, घटना, त्याचं इच्छित ध्येय साध्य करण्यास अनेकांचा हातभार लागलेला असतो. कार्यकर्ता मोठ्या जबाबदारीत मग्न असेल तर घरचा कारभार सांभाळणारी गृहलक्ष्मी... यांचा मोलाचा वाटा असतो. अशा सर्व सज्जनांच्या आठवणी प्रित्यर्थ हा अंक त्यांचे चरणी ठेऊन त्यांचे आशिर्वाद घेऊन कार्यास सुरुवात केली आहे.

२) गेली अनेक वर्षे कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमाखाली अंकाचे काम चालू आहे. आजच्या शतक महोत्सवी अंकाच्या मुक्कामापर्यंत पोहोचण्यास अनेकांचा हातभार लागला. हाताशी सुविधा नसताना अनेक प्रयत्न करुन हा अंक आजमितीपर्यंत चालू ठेवण्यात यश मिळविले. वि. गो. मराठे यांच्या हस्ताक्षरातील सदरहू अंकाचे लिखाण पुनर्मुद्रित केले आहे. त्यातील भावना प्रधान शब्दात केलेले आवाहन, कार्य प्रणाली साऱ्या बंधुभगिनीना त्यांच्या मनाला स्पर्श केल्याशिवाय राहाणार नाही. आमच्या आजच्या बंधूभगिनींनी हे सूत्र सामोरं ठेवून वाटचाल केली तर आनंदाला काय उणे!

३) संपादकीय या सदराखाली अंकाचे अंतरंग, त्यासाठी कार्यकर्त्यांनी केलेले प्रयत्न, याचे संबंधी आभार प्रदर्शनाची शब्दफुले त्यांचे समोर मोकळी करणे तसेच त्यांच्या परिवारातील सुविध व्यक्तीचा हातभार असल्यास त्याची नोंद घेणे संयुक्तीक ठरेल.

४) "जगावं तर उमलल्या फुलासारखं" मागील अंकावरुन नजर टाकली तर एक गोष्ट अवश्य पुढे येत आहे. ती म्हणजे स्वयंसेवक म्हणून पुढे आलेल्या व्यक्तींचा हातभार. येथे सोबतीनं काम करणाऱ्या मंडळीनी दूर न राहता आपली सारी शक्ती या कार्याच्या उत्कर्षासाठी वेचली आहे. त्यांचे बोल, त्याच्याच आपलेपणाच्या भावनेतून सर्व वाचकासमोर शब्दरुपाने ठेवली तर एक आनंद यात्रा ठरेल.

५) शाब्बास! गुणवंत हो! यशवंत हो! परिवारातील गुणवंत मुलामुलीनी आपल्या शालेय जीवनात उत्तुंग भरारी घेऊन नेत्रदीपक यश संपादन केलं आहे. यांचे चित्ररुप दर्शन पाहताना त्यांचे शब्द पुढे येतील व अभ्यासु मुलांना पुढील वाटचाल करताना मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडतील, व पुढील वाटचालीत त्याचा अंगिकार करता येईल.

६) उद्योगप्रधान बंधू-भगिनींच्या कार्याची माहिती, मिळविलेले मान-सन्मान या मागील पार्श्वभूमि निवेदन केल्यास उपयुक्त ठरेल.

७) निधनवार्ता या पृष्ठासाठी सौम्य शब्दात आंदरांजली या शिर्षकाखाली त्या व्यक्तीचे स्वभाव वैशिष्ठ, व्यवसायातील कौशल्य, गृहिणी असल्यास तिच्या कुटुंबासाठी तिने घेतलेले नवे उपक्रम, आवडी निवडी, स्वयंपाकातील प्रत्येक पदार्थाला नवा स्वाद, रुची देण्यामागील गुपितं असं प्रत्येक व्यक्तिनुरुप त्यांच्या गोड आठवणींचा परामर्श घेतला तर प्रत्येकाला आपल्या नात्यानुसार समाधानाची पावती मिळेल. अलिकडेच सातारा येथील माझे मित्र भेटले होते. त्यांच्या आईविषयी ते सांगत होते. त्यांची आई अल्पशा आजारात श्री चरणी विसावली. मी त्यांना "आदरांजली" म्हणून पत्र पाठविलं. पत्र त्यांना मिळालं अन् क्षणभर ते स्तंभित झाले. मला फोन करायला सुद्धा त्यांना अवसर मिळाला नाही. पत्रवाचता वाचता साक्षात आईच आठवणींच्या रुपानं पुढे होती. म्हणून गेलेल्या व्यक्तींच्या गोड आठवणींची जरुर दखल घेऊन पत्रोत्तरी उपयोग करावा. अशी व्यक्ती काहीकाळ तरी मन:शांतिचा धनी होते. सोबत त्याना पाठविलेल्या पत्राची एक प्रत आपल्यासाठी पाठवीत आहे.

**महत्वाच्या छायाचित्राबद्दल चार शब्द:**

१) स्पर्धेत अथवा शालेय वाटचालीत यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांच्या इतर स्पर्धकाबरोबरचे छायाचित्र चांगले दिसेल. माझ्या सोबत दाखविलेल्या अंकाकडे पाहिल्यावर कल्पना येईलच. २) हितगुज कार्यकर्त्यांच्या पासपोर्ट फोटो सोबत गोलमेज परिषदेच्या रुपाने छायाचित्र चांगले दिसेल. ३) मराठे प्रतिष्ठान तसेच हितगुज आधारस्तंभ श्रीम. सुलभाताईंचे इतर कार्यकर्त्यांसोबतचे छायाचित्र समर्पक ठरेल. हा शतक महोत्सवी अंक म्हणजे सर्व परिवाराचे तसेंच जुन्या आठवणींचे एक भांडार ठरणार आहे. एखाद्या निवांत क्षणी माझ्या सारख्या वयस्क व्यक्तीला त्यातून फेरफटका मारताना आनंद होईल.

दिनांक : २६ एप्रिल, २०१४

**राजा मराठे** (पृ.क्र. २३५)
१४, उद्यम कुंज सो. राणीसती मार्ग,
मालाड (पूर्व), मुंबई - ४०००९७

## भाऊचा धक्का

*"आदर्श" ची शाई पुसली, जुने डाग धुऊन निघाले*
*शुभ्र नवा सदरा मिरवत, हसत हसत स्वार निघाले*

... भाऊ मराठे (श्री. सदानंद विष्णु मराठे) (पृ.क्र.५०७)
दादर, मुंबई. दूरध्वनी: ०२२-२४४४८६४८ / ९८२१३६६२५२



Marathe Pratishthan

# चिरंतर नात्याचा स्वरयज्ञ

आद्यगुरू पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्या कडक शिस्तीत योग्य प्रकारे शिक्षण मिळालेले विनायकराव पटवर्धन. लाहोर येथे ९ वर्षे पंडितजींच्या कडक तालमीत तावून सुलाखून तय्यार झालेले विनायकराव. उंचापुरा बांधा, देखणे व्यक्तिमत्त्व, खडा आवाज असे सर्वगुणसंपन्न असलेले विनायकराव पंडितजींचे पट्टशिष्य होते. गुरूंचा शब्द ते कधी खाली पडू देत नसत. गुरूचे पण त्यांच्यावर प्रेम होते.

ते पुण्याला आले. योग्य संगीताचे शिक्षण, रियाज आणि प्रसन्न व्यक्तिमत्व त्यामुळे नाटक सिनेमासाठी विचारणा होऊ लागली. साक्षात बालगंधर्वांबरोबर नाटकात कामे सुरु झाली. माधुरी चित्रपटही झाला. प्रसिद्धी आणि पैसा दोन्ही गोष्टी साध्य होऊ लागल्या. फक्त उणीव होती वेळेची. आपले हे काम सांभाळून संगीत प्रचार-प्रसाराचे कामासाठी वेळ मिळत नव्हता. पं. विष्णु दिगंबरजी आजारी पडले तेव्हां त्यांच्या हे लक्षात आले, की आपला पट्टशिष्य वेगळ्याच कामात गर्क आहे. मग आपले संगीताचे आसिधाराव्रत कधी पुढे जाणार? त्यांनी विनायकरावांना बोलावून घेतले. आपल्या कामाची आठवण दिली आणि हे काम पुढे नेण्याचे वचन घेतले.

गुरूंना दिलेल्या वचनाचे श्रद्धापूर्वक पालन करायचे ठरवून पं. विनायकराव पटवर्धनांनी १९३२ साली पुणे येथे गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. दिवसेंदिवस विद्यालयाची चांगली प्रगती होऊ लागली. पं. विनायकरावांना पण चांगले कार्यक्रम मिळत होते. रेडिओ, ग्रोमोफोन कंपनी येथे रेकॉर्डिंग होत होते. गुरूबंधु पं. नारायणराव व्यास यांच्याबरोबर जुगलबंदीचे कार्यक्रम रंगत होते. तराण्यावर घेतलेल्या मेहनतीने तराणा ही त्यांची खासियत बनत गेली. तराणा, त्रिवट अशा गोष्टी पण रेकॉर्ड होऊ लागल्या. अनेक शिष्य तयार होऊ लागले. त्यातच आपल्या गुरूंचे सुपुत्र डि. व्ही. पलुस्करांवर संस्कार करताना, त्यांना मार्गदर्शन करताना त्यांना खूप आनंद होत असे. गुरूऋणातून अंशतः मुक्त होण्याची ही संधी आहे असे ते मानत.

गांधर्व महाविद्यालयाला १० वर्षे झाली आणि भारतीय संगीत प्रसारक मंडळाचे गांधर्व महाविद्यालय होऊन संस्था १९४२ मध्ये रजिस्टर झाली. संस्थेची घटना तयार झाली. अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्राचार्य, उपप्राचार्य सर्वांची नियुक्ती होऊन विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके मिळू लागली.

आपल्या गुरूंना दिलेला शब्द पं. विनायकबुवांनी आजन्म पाळला. नाटक-सिनेमातल्या प्रसिद्धी, पैशापेक्षा मानाची श्रीमंती श्रेष्ठ ठरली. गुरूंच्या वचनाला जागल्याचे समाधान, शांती मिळाली. घरीसुद्धा त्यांच्या सहधर्म सहचारिणीने त्याला समाधानी जोड दिली. ह्या मराठ्यांच्या माहेरवाशिणीने शिष्यांच्या मनात अक्का (वहिनीसाहेब) म्हणून मान मिळवला. एचएमव्ही रेकॉर्डस् कंपनी आणि आकाशवाणीमुळे त्यांचे गाणे घराघरात पोहोचले आणि शास्त्रीय संगीताचे त्यांचे कार्य गांधर्व मुळे रसिकांच्या मनामनात पोहोचले.

१९६५ साली संगीत नाटक ॲकॅडमीची फेलोशिप त्यांना मिळाली आणि १९७२ साली पद्मभूषण हा मानाचा सन्मान मिळाला.

नीटनेटकेपणा, शिस्तप्रियता, स्वावलंबन, चारित्र्यसंपन्न असे विशेष गुण तर त्यांच्यात होतेच, पण गुरूवर असलेली भक्ति, आदर, प्रेम आणि वचनबद्धता ह्या गुणांमुळे त्यांचे जीवन कृतार्थ झाले. गुरूंचा आशीर्वाद आणि शिष्यांची सचोटी ह्या गोष्टींमुळे पुण्यातील प्रतिथयश गांधर्व महाविद्यालय ही संस्था ८२ वर्षे सातत्याने चालू आहे, पुढेही राहिल. म्हणूनच म्हणावेसे वाटते अशी गुरू शिष्य जोडी पुन्हा होणे नाही. २२ जुलै पृ.क्र.१२वर

---

हरहर मराठे प्रतिष्ठानचे
मा. हितगूज

हितगूज डिसेंबर २०१३ चा अंक हाती पडला आणि शेवटच्या पानावरील "संवाद कुलबांधवांशी" हा श्री. हेमंत अरुण मराठे यांच्या लेखात मुलांचे यश मुलांनीच पत्र पाठवून कळवावे असे वाचल्यावर माझ्या डोळ्यासमोर माझ्या धाकट्या भावाचा मुलगा कु. प्रणित प्रमोद मराठेच उभा राहिला. मग विचार केला, त्याने आत्ता मिळावलेल्या यशाबद्दल आपणच लिहावे.

संगीताची परंपरा लाभलेल्या घरात प्रणितचा जन्म झाला. प्रणितचे आजोबा कै. जी. जी. मराठे हे गांधर्व महाविद्यालय पुणेचे ३५ वर्षे प्राचार्य होते. त्यांची बहीण कै. राधाबाई पटवर्धन, म्हणजे पद्मभूषण पं. विनायकराव पटवर्धन यांची सहचारिणी.

आद्यगुरु पं. विष्णु दिगंबर पलुस्करांचे पट्टिशिष्य असलेले पं. विनायकराव पटवर्धन यांनी १९३२ साली हे गांधर्व महाविद्यालय सुरु केले. प्रसिद्ध हामोनियम वादक पं. प्रमोद मराठे - सध्याचे गांधवचे प्राचार्य हे प्रणितचे वडील, तर ज्ञानप्रबोधिनीच्या कडक शिस्तीत शिकलेली हुशार प्ररिणिता मराठे ही प्रणितची आई.

खरं तर प्रणित हा इंजिनियरींगचा विद्यार्थी. पण घरात असलेल्या संगीतकलेवर पण त्याचे तेवढेच प्रेम. शाळा-कॉलेज करता करता गांधर्वमध्येच लहानाचा मोठा झालेल्या प्रणितने आई-वडीलांप्रमाणेच हार्मोनियमचा वारसा जोपासला. फक्त २० वर्षाचा असलेला प्रणित शिष्यवृत्तीच्या परीक्षेला बसला आणि गेल्या महिन्यातच ११ डिसेंबर त्याला केंद्र सरकारची सांस्कृतिक खात्याची शिष्यवृत्ती मिळाली. दोन वर्षासाठी महिना ५०००/- असे त्याचे स्वरुप आहे. पण आता प्रणितची जबाबदारीही वाढली आहे. अर्थात त्याच्या वडीलांच्या तालमीत भरपूर रियाज करुन ती तो पार पाडेल अशी मला म्हणजे त्याच्या आत्याला खात्री असल्यामुळेच हा लेखन प्रपंच!

हो, पण प्रणितची ओळख इथेच संपत नाही. तो उत्तम बॅडमिंटन खेळाडू आहे. हार्मोनियम विशारदचा अभ्यास करतोय. गांधर्वच्या वेबसाईटसाठी मदत करतोय. शाळेत १० वीत असताना मॅक्समुल्लर भवन मधून जर्मन ह्या भाषेत त्याने पहीला नंबर मिळवला आणि २१ दिवस संस्थेतर्फे जर्मनीला जाऊन आला. ९ वीत असताना एकटा सिंगापूरला जाऊन आला म्हणून आम्ही सर्व भावंड त्याला "बापसे बेटा सवाई" म्हणायचो.

डिसेंबर महिना ह्या मराठे परिवारासाठी फारच भाग्यशाली ठरला. १ डिसेंबर रोजी पं. प्रमोद मराठे यांना इंदूरचा कै. पं. बंडूभैय्या चौघुले



**प्रणित प्रमोद मराठे (पृ. १२९)**

सन्मान प्राप्त झाला. २३ डिसेंबर रोजी पुण्याच्या शनिवार वाडा सांस्कृतिक महोत्सवात ८२ वर्षे सातत्याने कार्यरत असलेल्या गांधर्व महाविद्यालयाच्या १५० विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली आणि आपल्या कारकीर्दीत विद्यालयाची उत्तुंग प्रगती करणाऱ्या पं. प्रमोद मराठे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

"कुटुंब रंगलंय संवादिनीत" हा विशेष कार्यक्रम प्रणितने आपल्या आई-वडीलांबरोबर सरगम संगीतमध्ये सादर केला. १५ डिसेंबर रोजी सरगम संगीत विद्यालयाच्या वार्षिक संमेलनात सर्वांच्याच वादनाने रसिकांशी योग्य संवाद साधला आणि दाद मिळवली.

"संवाद कुलबांधवांशी" ह्या लेखामुळे अनेक मराठे लिहिते होतील असे वाटते. श्री. हेमंत अरुण मराठे यांना धन्यवाद!

**सौ. वर्षा नंदलाल गोडबोले** (पृ. १२९)
संचालिका, सरगम संगीत विद्यालय,
रघुनंदन, ४५, मयुर कॉलनी, कोथरुड,
पुणे - ४११०३८ दूरध्वनी - ०२०-६५२१९४४४
भ्रमणध्वनी - ९८२२७५४६४०

Marathe Pratishthan

# आमच्या आई

## सहवेदना... आपण यांना अंतरलो... भावपूर्ण श्रद्धांजली

भारतातील पहिली कर्तबगार महिला इलेक्ट्रॉनिक्स आणि रेडिओ इंजिनियर ज्यांनी पती निधनानंतर रेडिओ इलेक्ट्रिक इन्स्टीट्यूटची धुरा यशस्वीपणे संभाळली आणि वाढवीली. मराठे परिवाराला ज्यांचा अभिमान वाटतो त्या कै. श्रीमती शालिनीताई यांचा दि. २० मार्च २०१४ ला निधन झाले. दि. २९ मार्च २०१४ ला दादर क्लब हाऊस येथे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मी स्वत: उपस्थित होते. मराठे प्रतिष्ठानवर त्यांचा फार लोभ होता. "हितगुज"चे बदलते स्वरुप त्यांना आवडले होते. माझ्या संपादकीय कामाची आणि लेखनाची त्या दूरध्वनीकरुन प्रशंसा करीत. हितगुजला १०,००० रु. देणगी म्हणून त्यांनी दिले होते.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्रीमती शालिनीताई धुंडिराज मराठे यांना श्रद्धांजली (त्यांच्या सुनबाई सौ. संजीवनी उमेश मराठे यांनी लिहिलेला "आमच्या आई" हा लेख पुर्नप्रकाशित करत आहोत.)

\- संपादिका

**सन १९३४ साली दत्तात्रेय हरि मराठे व धुंडीराज हरि मराठे या बंधूंनी तंत्रिशिक्षणासाठी रेडिओ इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूटची स्थापना केली. रेडिओ तंत्रशिक्षण देणारी भारतातील ही पहिली संस्था होय. व्यवसाय तंत्रशिक्षण क्षेत्रात मराठे बंधु, धुंडीराज मराठे यांच्या इंजिनिअर पत्नी श्रीमती शालिनी मराठे व त्यांची दुसरी पिढी सौ. शीला मराठे - चिटणीस, श्री. उमेश व सौ. संजीवनी मराठे यांनी भरीव कामगिरी केली आहे. २००९ साली या संस्थेचा अमृत महोत्सव झाला. त्यांच्या सुनबाई सौ. संजीवनी यांनी लिहीलेला हा लेख.**

आमच्या आई, श्रीमती शालिनी मराठे, या मूळच्या मिरजेच्या! वडिलांच्या अत्यंत प्रगत, काळाच्या पुढे असणाऱ्या विचारांच्या संस्कारात वाढलेल्या ! त्यांचा जन्म १९२२ सालचा, म्हणजे आईंची ८६ वर्षे पुरी झाली. प्रत्येक स्त्रीला अभिमान वाटावा, मार्गदर्शकपर वाटावा असा त्यांचा जीवन-प्रवास!

आपल्या शास्त्रकारांनी मनुष्यजीवनाचे चार टप्प्यांत शिक्षण, दुसऱ्या टप्प्यात गृहस्थजीवन, तिसऱ्यात वानप्रस्थ व चवथा संन्यासाश्रम! आमच्या आई हे पहिले तीनही टप्पे आदर्शवत जगल्या. पहिल्या टप्प्यात त्या मॅट्रिकच्या परिक्षेत सांगली जिल्ह्यांत मुलींमध्ये पहिल्या आल्या व नंतर पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून गणित विषय घेऊन ग्रॅज्युएट झाल्या. यथावकाश १९४४ साली लग्न होऊन मराठे कुटुंबियांची सून झाल्या. मराठे कुटुंब हे त्याकाळचे उच्चशिक्षित (पती-धुंडीराज M.A.B.T. एक दीर डॉक्टर, एक इंजिनिअर). त्यांच्या दीराने व पतीने एकत्र रेडिओ इलेक्ट्रिक इंस्टिट्यूट ची १९३४ साली व १९३९ साली एका लघुउद्योगाची स्थापना केली.

असा प्रगत कुटुंबात प्रवेश केल्याने आईंच्या मूलभूत स्वतंत्र बुद्धिला उत्तेजनच मिळत गेलं. अतिशय उत्तम सांपत्तिक परिस्थिती असूनही घरांत किंवा क्लबमध्ये वेळ फुकट घालवणे पसंत नसल्याने आईने रेडिओ इलेक्ट्रिक इंस्टिट्यूटमध्येच प्रशिक्षण घेऊन व स्वतंत्र अभ्यास करुन त्याकाळची मान्यताप्रत ग्रॅज्युएट ऑफ ब्रिटीश इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (हल्लीच्या AMIE प्रमाणे) ही इंजिनिअरिंगमधील पदवी प्राप्त केली. त्यानंतर पतींना व दिरांना थोडाथोडा हातभार लावू लागल्या.

मला वाटते, आमच्या आई त्या वेळेस महाराष्ट्रातल्या, कदाचित भारतातल्या, काही मोजक्या स्त्री इंजिनिअर्सपैकी असाव्यात. १९६०-६१ पासून त्या इंस्टिट्यूटमध्ये शिकवायला लागल्या. त्यांचे विषय होते इलेक्ट्रॉनिक्स व रेडिओ इंजिनिअरिंग एक उत्तम शिक्षिका म्हणून त्यांचा नावलौकिक होता. याच सुमारास (६५-७२) आईंनी विद्यार्थ्यांसाठी तीन टेक्निकल पुस्तके लिहिली. १९६७ च्या सुमारास रेडिओ सर्विसिंगवर, १९६९ साली टेक्निकल गणितातील प्रश्नांवर, १९७० साली ट्रान्झिस्टर सर्विसिंगवर. १९७२ साली दीर पावले व इन्स्टिट्यूट व फॅक्टरी अशी दुहेरी जबाबदारी आईंवर पडली.

१९६६ साली आई इलेक्ट्रिकल इंजिनियरींग फॅक्टरीत उत्पादनतंत्र जाणून घेण्यासाठी सहा महिन्यांसाठी जर्मनीला गेल्या होत्या. तिथे त्या एका किफान नावाच्या जर्मन कुटुंबात रहात होत्या. सौ. किफानने एकदा त्यांना विचारलं की आमचा मॅक्सम्युलर ज्या ग्रंथाला डोक्यावर घेऊन नाचला त्या भगवत्गीतेबद्दल फारशी माहिती नव्हती. अतिशय शरम वाटली त्यांना! भारतात आल्यावर जाणून घ्यायचा निश्चय केला. हा एक ईश्वरी संकेतच होता! त्यांच्या वानप्रस्थतजीवनाचा पाया बनणारा, पुढच्या आयुष्याची दिशा ठरवणारा हा सौ. किफानचा प्रश्न! भारतात आल्यावर शोध घेऊ लागल्या कि हे तत्वज्ञान कुठे शिकता येईल? त्यांच्या सौभाग्याने व ईश्वरकृपेने त्या स्वामी चिन्मयानंद (चिन्मय मिशन व विश्व हिंदू परिषदेचे संस्थापक) यांच्या सहवासात आल्या. स्वामी चिनमयानंदांचं प्रभावी वक्तृत्व, अस्खलित इंग्रजी, तत्वज्ञानासारखा गहन विषय सहजसुलभ करुन सांगण्याची पद्धत, तसच अतिशय विज्ञानयुक्त विश्लेषण या सर्वांनी त्या अत्यंत भारावून गेल्या. घर, संसार, इन्स्टिट्यूटचा प्रपंच या बरोबरच आणखी एक परिणाम त्यांना लाभलं. सर्व काही सांभाळून स्वामीजींचे ज्ञानयज्ञ ऐकण! त्यांच्या शिबिरांना जाणे, चिन्मय मिशनच्या गिरगावातील कमिटीवर काम करुन विचारसत्र, ज्ञानयज्ञ आयोजित करणे या ही गोष्टी मन:पूर्वक करु लागल्या. १९७६ साली छोट्या आजारामध्ये त्यांच्या पतीचं देहावसान झालं. शांत प्रकृतीच्या, धीरगंभीर स्वभावाच्या पतीचे भक्कम पाठबळ नाहीसे झाले. अनेक वर्षाच्या सुखी सहजीवनाचा अचानक शेवट झाला होता. ह्या बेचैनी व अस्थिरतेच्या काळात त्यांच्या मदतीला धावली त्यांची मुलगी शीला. आपली उत्तम पगाराची व परदेशात जाण्याची सुसंधी सोडून आपल्या आईच्या मदतीला आली व आईंच्या बरोबर ऑफिसमध्ये काम करु लागली. एका वर्षाने मुलगा उमेश I.I.T. तून B.Tech. होऊन आला व परदेशी शिक्षणाच्या संधी डावलून संपूर्ण फॅक्टरीची जबाबदारी त्यानी उचलली. इन्स्टिट्यूट शालाताई व फॅक्टरी उमेश. अशी जबाबदारी वाटून आई हळूहळू निवृत्तीच्या दिशेने पाऊल उचलू लागल्या.

आमच्या आईंनी त्यांच्या आयुष्याच्या तिसऱ्या टप्प्यात म्हणजेच वानप्रस्थान प्रवेश केला. साठीनंतर चिन्मय मिशनमध्ये वर्षभर राहून वेदान्ताचा कोर्स पूर्ण केला व पुणे ही कार्यभूमी केली. तिथे चिन्मय मिशनतर्फे प्रवचनसत्र (गीता/उपनिषद) २/३ अभ्यासवर्ग वगैरे त्या स्वत: घेतात. चिन्मयमिशनच्या अनेक स्वामींचे ज्ञानयज्ञ आयोजित करतात. इतकेच नव्हे तर त्यांनी चिन्मय मिशनसाठी स्वामीजींच्या दोन इंग्रजी पुस्तकांचे मराठीमध्ये भाषांतरही केले. हृयामि च पुन: पुन: हे स्वामी चिन्मयानंदांच्या आठवणी असणारे पुस्तक मराठीत वयाच्या ऐंशीव्या वर्षी लिहील.

आई ८० व्या वर्षानंतर इंटरनेट वापरायला शिकल्या. आता वेबसाईटस् पहातात, स्वत: ईमेल्स करतात! ८६ व्या वर्षी देखील आम्हाला लाजवेल असा उत्साह असणाऱ्या, आमच्यापेक्षाही व्यस्त जीवन जगणाऱ्या, जीवनात अजुनही रस टिकून असलेल्या!

स्वत:च्या धंद्यातून अत्यंत मानाच्या जागेवरुन स्वत:हून निवृत्ती घेऊन वेगळा मार्ग चोखाळणाऱ्या!

आम्ही सर्व त्यांचा आजही सल्ली घेतो, त्यांच्या शाबासकीची वाट पहातो.

(दि. ८ मार्च २००९ ला जागतिक महिलादिनी कर्तबगार स्त्रियांचा सत्कार महानगरपालिकेने केला. श्रीमती शालिनीताईंचा सत्कारही महापौर शुभा राऊळ यांनी शाल आणि श्रीफळ देऊन केला. मराठे प्रतिष्ठानद्वारा शालिनीताईंचे अभिनंदन.

**सौ. संजिवनी मराठे, डायरेक्टर** (पृ.१३४)
(हितगुज, जून २००९ वरुन पुर्नप्रकाशित)

## रक्षा बंधन

श्रावणातील पौर्णिमेचा
आज रक्षा बंधनाचा
दिवस आला सोनियाचा
भगिनी बंधू रायाचा
स्वागत करु सकलां
रिमझीम रिमझीम पाऊस पडे
हिरवळ दाटे चोहींकडे
क्षणांत पाऊस ऊन पडे
इंद्रधनुचे सप्तकडे
सात जलाशय भरुन पडे
आनंदाचे चोहींकडे सडे
पुजा करिती सागराची
श्रीफळ देऊन शांत करी
नौका चालल्या दूरवरी
घराघरातूनी रक्षा बंधन
भगिनी ती बांधे रक्षा कंकण
भाऊ देई रक्षेचे आंदण
सण आला मोठा
रक्षा बांधीनी सूर सैनिका
मंत्री, संत्री घरात येला
शपथ तुला रक्षण्याची
कोणा नाहीं सख्खा भाऊ
कोणा नाही सख्खी भगिनी
अंतर नका देऊ
रक्षण करणे तव भगिनीचे
कर्तव्य आहे भाऊरायाचे
खूणगाठ बांधा अंतरी
कराहो रक्षाबंधन घरोघरी
हीच विनंती भाऊरायाची खरी

**श्री. गोविंद ना. मराठे (पृ. ५४०/५४१)**

श्री समर्थ सदन, तिस्क-उसगाव,
गोवा-फोंडा रोड - ४०३ ४०६
मोबाईल : ९६६५८५५७९७

चिरंतर.. पृ.क्र. १० वरुन

१८९८ ते २३ ऑगस्ट १९७५ असे ७७ वर्षाचे आयुष्य त्यांना मिळाले. त्यातील ६२ वर्षे संगीतमय जीवन ते जगले. पुढील पिढीसाठी पुस्तकरूपी संगीत ठेवा त्यांनी ठेवला आहे.

अशा वचनबद्ध संगीत योग्याला शतशः प्रणाम !

**सौ. वर्षा नंदलाल गोडबोले (पृ. १२९)**

संचालिका, सरगम संगीत विद्यालय,
रघुनंदन, ४५, मयुर कॉलनी, कोथरुड,
पुणे -४११०३८ दूरध्वनी:०२०-६५२१९४४४
भ्रमणध्वनी - ९८२२७५४६४०

# वाचकांचा पत्रव्यवहार

।।श्रीराम समर्थ।।

डॉ. सौ. सुमेधा वहिनीस

सादर सप्रेम नमस्कार, वि. वि.

हितगुजच्या शताब्दी अंकानिमित्त आपण मराठे परिवारातील सदस्याना केलेलं आवाहन - "नव्या अंकाचं रुपरंग कसं असावं?" वाचून आनंद झाला. परिवार म्हटला की त्यात लहान मोठे, जवळचे दूरचे, विद्वान अडाणी, अशी असंख्य नात्याने सारी मंडळी समोर येतात. आपल्या माणसांची पत्र, आठवणी वाचताना प्रत्येकाला आनंद वाटतो. गतकाळातून सफर करताना मनाला एका वेगळ्या वातावरणात संचार करण्याची संधी मिळते. त्यामुळे आजच्या धकाधकीच्या रेट्याखाली होरपळलेल्या प्रत्येकाला थोडी मायेची फुंकर अशा लेखनाद्वारे मिळते. आपल्या बांधवांचे साधक बाधक विचार, हुंकार अथवा गीत ऐकताना प्रत्येकजण आपल्या घरच्या माणसामध्ये विसावतो, मनाचा आराम मिळतो. सौ. सुमेधा वहिनी... आपल्याकडे ही सृजन शीलतेची दैवी देणगी आहे. मला हे वाचल्यानंतर काही गोष्टींची रेखाटने, अंकाचे रुपरंग कसे असावे याचं एक चित्र सामोरं आलं. ते आपल्यापर्यंत पोहोचविण्याचे काम या पत्राद्वारे मी करणार आहे. अंतिम निर्णय आपल्या संपादक मंडळाचा असेल.

हितगुजचा शताब्दी अंक म्हणजे गतकाळच्या सोनेरी पाऊल खुणा ठराव्यात असा राहिल. गेल्या अनेक वर्षामध्ये आपल्या परिवारातील थोर विचारवंतानी आपल्या विविध विषयाद्वारे आपले विचार सौंदर्य साऱ्या परिवारासाठी खुलं करून टाकलं यासारखी नामी संधी ती काय असू शकेल! वयानुरुप बाळचे बाबुराव झालेल्या बांधवांचे यशाचे दैदित्यमान शिखर पाहून मन आनंदाने उधाण आलेल्या लाटेसारखे नाचू लागेल. अनुभवांची ही शिदोरी प्रत्येकालाच एका नव्या विश्वात घेऊन जाईल. कारण अशा शिदोरीतील अमृत कणामुळे यशाची पायरी चढताना अनेकाना मोलाचा आधार मिळाला आहे. संपादक या नात्याने खालील गोष्टींकडे एकवार नजर टाकल्यास योग्य होईल.

१) या अंकाची पहिली प्रत बांधवांच्या हाती कशी आली? त्याकाळी कम्प्यूटर आदी उपकरणांचा, कंपोझिंगसाठी लागणाऱ्या उपकरणांची सहज अशी उपलब्धता नव्हती, त्यावेळी आलेल्या अडचणी कशा निवारल्या? २) पुढे येणाऱ्या अंकामध्ये त्यातील काही भाग देता आला तर पहावा. ३) आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या काम धंद्यामध्ये, तसेच परदेश शिक्षणाचे धडे घेताना, आलेले अनुभव सांगता आले तर शब्दांकित करावे. ४) आजच्या काळात नोकरी कामधंद्यामध्ये विशेष कामगिरी पार पाडणाऱ्या उद्योजकांचे अनुभव कसे होते. मराठे परिवारातील उत्साही तरुण याचे धडे घेण्यास पुढे आला का? ५) अंक छपाईचे वेळी लेखकाचे नाव व कंसात पृष्ठक्रमांक दिला जातो. हे थोडं सुधारता आलं तर अक्षर रचना शास्त्राला अनुरुप दिसेल. त्याची रचना कल्पना येण्यासाठी मी पाठवीत असलेल्या अंकात पहावी. ६) अंक प्रसिद्धीचे निमित्ताने कम्प्युटर सुविधेमुळे "हितगुज" हे अक्षर व बाजूला दाखविलेले बोधचिन्ह यांची ओढाताण न करता प्रारंभापासून जे केले आहे त्या आकृतीबंध रचनेप्रमाणे कार्यवाही व्हावी.

७) अंकात प्रसिद्ध झालेल्या फोटोंची माहिती तळटिपेद्वारे फोटोच्या खाली देण्याची प्रथा आहे. फोटोवरली केलेले हे रंगीत खोदकाम सर्वथा वर्ज्य आहे. फोटो आपल्या रचना व विषयाचे आधारे वाचकासमोर उभा राहतो. त्याला रंगीबेरंगी चौकटीची गरज नाही. वाचकाचे त्यामुळे डोळ्यावरती अकारण ताणामध्ये रुपांतर होते.

वरील सर्व सुचना परिवार सदस्य या नात्याने मित्र म्हणून शास्त्राला धरुन आपल्याकडे पाठवित आहे. गैरसमज होऊ नये म्हणून थोडं विस्तारानं लिहीलं आहे. सर्व कार्यकर्त्यांना सप्रेम नमस्कार.

कळावे,

आपला स्नेहांकित,

**राजा मराठे (पृ. २३५)**

१४, उद्यम कुंज सो. राणीसती मार्ग,
मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वा. कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करुन यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दि. ४ एप्रिलला दुपारी ४ वा. श्रीनिवास अनंत मराठे, शिवाजी पार्क, दादर यांच्या निवासस्थानी म.प्र. च्या कार्यकारिणीची बैठक भरली. बैठकीला अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, उपाध्यक्ष सी. गो. खांबेटे, श्री. मोहनराव मराठे, कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर दामोदर मराठे, श्री. सुरेशराव मराठे, डोंबिवली, कार्यवाह श्री. हेमंत अरुण मराठे, नालासोपारा, श्री. संजय खांबेटे, साकीनाका, अंधेरी हितगुज संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे इ. उपस्थित होते.

कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. पत्रव्यवहार आला नसल्याने त्याचे वाचन झाले नाही. गोवा येथील संमेलनवृत्त कार्यवाहांनी थोडक्यात सांगितले. हितगुजचे प्रकाशन कुरियर, पोष्टाने वाटप यावर गंभीर चर्चा झाली. श्री. रमाकांत विद्वांस यांनी त्यांची मते मांडली. हितगुजचा खर्च, सर्व संमतीने मंजूर करण्यात आला. श्रीनिवास मराठे प्रतिष्ठानची वेबसाईट, कुलवृत्तांत करीत आहेत. त्याविषयी चर्चा झाली. पहिली महिला रेडिओ इंजीनियर शालिनीताई मराठे यांची शोकसभा, शनिवार, दि. २९ मार्चला संध्याकाळी दादर क्लबमध्ये होती. मराठे प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. सो. सुमेधा प्र. मराठे यांनी कै. शालिनीताईंच्या प्रतिमेला फुले वाहून श्रद्धांजली वाहिली. शालिनीताईंच्या कुटुंबियांची ओळख झाली. "हितगुज" मध्ये कै. शालिनीताईंवर लेख लिहिण्याची विनंती केली. कै. शालिनीताईंचा मराठे प्रतिष्ठानवर लोभ होता. "हितगुज"च्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमाला ठाणे येथील लक्ष्मी केशव सभागृहात त्या जातीने पूर्णवेळ उपस्थित होत्या. हितगुज चांगला निघायला लागला आहे. संपादन उत्कृष्ट आहे असे दूरध्वनीवर वा प्रत्यक्ष भेटीत त्या संपादिकेला कौतुकाने सांगायला कधीही विसरत नसत. या निमित्ताने शालिनीताईंच्या सुखद स्मृतींना उजाळा मिळाला. कार्यवाह श्री. हेमंत अरुण मराठे यांनी रेडिओ स्कूलमध्ये शिक्षण घेतल्याचे सांगितले. कै. शालिनीताई त्याला गुरुस्थानी वंदनीय आहेत.

त्यानंतर आपल्या प्रतिष्ठानकडे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मदत करण्याकरता निधी उपलब्ध आहे. अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांनी त्यासाठी देणगी दिलेली आहे. चि. हर्ष मनोज पूराबिया हा हुशार विद्यार्थी सरस्वती मंदिर माहीम या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता तिसरीत शिकत आहे. अभ्यासात तो खूप वरचढ आहे. तसेच खेळांत व इतर शाळेय उपक्रमात ही तो त्याच्या गुणवत्तेने चमकत आहे. त्याला पुढच्या वर्षाची शालेय फी, गणवेश व पुस्तके इ. चा खर्च भागवायला त्याच्या आई-वडिलांना ते सफाई कामगार असल्याने कमी पगारात भागवणे कष्टाचे होते तेव्हा त्यांच्या गुणी, हुषार मुलाला ३००० रु. मदत म्हणून देण्याचे बैठकीत ठरविण्यात आले.

श्री. श्रीपाद विनायक मराठे, मु. पो. पडेल, ता. देवगड यांनी आजीव सभासदत्वासाठी रु. ५०० श्री. सुरेश मराठे यांच्याबरोबर पाठविले. त्याचप्रमाणे श्री. संजय खांबेटे, साकीनाका यांनी रु. २००० हितगुजची वर्गणी चेकद्वारे दिली. श्री. प्रभाकर मराठे यांनी लगेच दोघांना पावती दिली.

चहा - फराळ होऊन, मा. अध्यक्षांचे आभार मानून सभा समाप्त करण्यात आली.

## नजर टाकावी.. आशीर्वाद द्यावा...

मराठे प्रतिष्ठान ने यापूर्वी अनेक कुलबांधवांना अडचणीत मदत केली आहे. कोणाला ऑपरेशनसाठी वैद्यकीय मदत तर कोणाला अडलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी तर कोणाला स्वतंत्र उद्योगधंदा करण्यासाठी म्हणून मदत केली आहे.

प्रतिकूल परिस्थितीत, अडचणीतून मार्ग काढण्यासाठी प्रतिष्ठानने हात देऊन अनेक कुटुंबांना सावरले आहे. तेव्हा परमेश्वर कृपेमुळे आणि त्यांच्या भाग्योदयाने आज चांगले सुखाचे दिवस आले आहेत त्यांनी प्रतिष्ठानकडे नजर टाकावी, प्रतिष्ठानला विसरु नये, प्रतिष्ठानला आशीर्वाद द्यावेत आणि देणगी देऊन स्वत:ला व प्रतिष्ठानला उपकृत करावे ही विनंती. आपल्या देणगीचा गरजू, होतकरु कुलबांधवांना उपयोग होईल.

– वा. ग. मराठे (पृ. ५०३) (मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ)

### हितगुज वर्गणीदार - देणगीदारांची नांवे

श्री. दीपक बाळकृष्ण मराठे, शिरोडा गोवा
श्री. अमोल परशुराम मराठे, मुळगाव - गोवा.
श्री. श्रीपाद विनायक मराठे, पडेल (देवगड-सिंधुदूर्ग)
श्री. संजय खांबेटे, अंधेरी साकीनाका, मुंबई
श्री. दिलीप मराठे (निवृत्त जज्ज), बोरीवली,
श्री. किशोर रामचंद्र खांबेटे, अहमदाबाद
चित्रकार कुमुद सुदाम डोके

### आवाहन *मराठे प्रतिष्ठान हितगुज च्या लेखनप्रिय सभासदांना,*

कुलबांधवांनो, हितगुजचा १०० वा अंक तुमच्या साहित्याने सजणार आहे. तुमच्या साहित्यामुळेच अंक प्रकाशित करण्याचा आमचा उत्साह द्विगुणित होतो. तेव्हा यावर्षीच्या हितगुज अंकासाठी आपल्या कथा, कविता, ललीत लेख, अनुभव, प्रवासवर्णन इत्यादी साहित्य आपल्याकडून अपेक्षित आहे.

साहित्य मजकुराविषयी सूचना : १) साहित्य स्वतंत्र असावे, तसेच इतरत्र प्रसिद्धीस दिलेले असू नये. २) संकलन केलेले साहित्य मूळ संदर्भासह असावे. ३) मजकूर ओळी असलेल्या कागदावरच सुवाच्च अक्षरात लिहिलेला असावा. ४) कागदाच्या एकाच बाजूला लिहावे. व्यवस्थित समास असवा. ५) झेरॉक्स कॉपी पाठवू नयेत. ६) मजकूर फक्त १००० शब्दापर्यंतच असावा, तो पाठविण्याची शेवटची तारीख १० नोव्हेंबर २०१४ राहील.



Marathe Pratishthan

# पद्मदुर्ग (कासा किल्ला)

एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात माझ्या मित्राचा फोन आला, ट्रेकला जायचे आहे. त्याला म्हटले कुठे उन्हात मरायला जातोय ? तो म्हणाला, संधी चांगली आहे. पद्मदुर्गला जायचेय. मग मात्र लगेच तयार झालो. ४ मेच्या रणरणत्या उन्हात आम्ही पद्मदुर्ग अनुभवला!

खरेतर पद्मदुर्ग पहाणे वेळेच्या दृष्टीने निव्वळ नशिबाचा खेळ या प्रकरणात मोडते. कारण दर्याला आलेले उधाण, वातावरणातील बदल, आणि बोटवाल्या कोळी लोकांचा नकार. अखेर जादा पैसे देऊन बोटवाले तयार होतात. आणि मग आमच्यासारखे वेडे मे महिन्याच्या उन्हामध्येसुद्धा पद्मदुर्ग पाहण्याकरीता बोटीकडे वळतात.

मुरुड गावातून सुटणाऱ्या बोटीतून अर्धा ते पाऊण तासाचा उत्कंठावर्धक जलप्रवास करुन पद्मदुर्गाजवळील खडकावर पायउतार व्हायचे. आणि पडकोटाच्या भग्न भागातून किल्ल्यात प्रवेश करायचा. पद्मदुर्गाच्या मुख्य चौकोनी दुर्गाच्या बाहेरील पडकोट समुद्राच्या लाटांच्या तडाख्याने मुख्य गडापासून तुटून वेगळा पडला आहे. गडाच्या या बाहेरील भागात डाव्या हाती एक भक्कम बुरुज आहे. या बुरुजावर एक खोली असून त्याच्या भोवती असलेल्या चर्यात तीन तोफा आहेत. बुरुजावरील चर्या किंबहूना संपूर्ण किल्ल्याच्या तटबंदीवरील चर्या या कमळाच्या पाकळ्यांच्या आकारासारख्या आहेत. कदाचित यामुळे या गडाचे नाव पद्मदुर्ग असे पडले असावे. पडकोटात एक कोरडी विहिर, एक मंदिर, १०-१२ तोफा व दोन इतिहासकालीन इमारतीचे चौथरे आहेत. पडकोटाच्या दक्षिणेस असलेल्या जंजिरे मेहरुबकडून पद्मदुर्गास उपसर्ग पोहोचू नये म्हणून मोठी भिंत बांधून घेतली आहे. पण सद्याची बरेच ठिकाणी ढासळली गेली आहे. तर काही ठिकाणी ती पाडली गेली आहे.

असे म्हणतात की साधारण ४० वर्षांपूर्वी या किल्ल्याचा वापर स्मगलिंगसाठी केला जात होता.

पडकोट पाहून मुख्य गडदर्शनासाठी पडकोटाच्या दिशेने असलेल्या दरवाजातून पद्मदुर्गात प्रवेश करावा. चार पायऱ्या चढून ऐन गडात प्रवेश करताच प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस पहारेकऱ्यांच्या देवड्या लागतात. त्यापुढे इतिहासकाळातील चौथऱ्यावर काही वर्षापूर्वी बांधल्या गेलेल्या कस्टम अधिकाऱ्यांच्या घरांचे भग्न अवशेष आहेत. हे अवशेष पहात डाव्या हाताने पुढे गेल्यास तटात बांधलेली दारुकोठाराची भक्कम खोली दिसते. दारुकोठारा पलिकडे समोरिल बाजूस तटाला लागूनच कमान असलेली सुंदर वास्तू दिसते. गडाच्या या बाजूस घडीव चिऱ्यात बांधलेले पाण्याचे तीन भक्कम हौद आहेत. या हौदातील जिवंत झऱ्यामुळे पाणी स्वच्छ असल्यास ते पिण्यायोग्य आहे. आपण सुरुवातीला ज्या द्वाराने गडात प्रवेश केला त्याच्या समोरच पद्मदुर्गाचा मुख्य दरवाजा म्हणजे दर्या दरवाजा आहे. हा दरवाजा अजूनही भक्कम अवस्थेत असून त्याच्या बाहेरील तटाच्या बांधणीतील दगड किंबहूना संपूर्ण तटाच्या काही ठिकाणातील दगड लाटांच्या घर्षणाने झिजले आहेत. पण गडबांधणी करतेवेळी दोन चिऱ्यांमधील वापरलेले मिश्रण मात्र झिजलेले नाही. हे मिश्रण करताना चुन्यात डिंक, शंख-शिंपल्यांचा चुरा, काळेगुळ, मध व काथ्याकुट करुन घाण्यात घोटून एक जीव करीत असत.

पद्मदुर्गाच्या चारही बाजुचा तट आजही उत्तम स्थितीत असून त्यात सहा ठिकाणी भक्कम बुरुज उभे करण्यात आलेले आहेत. तटबंदीला लागून फांजी असून त्यावर चढण्यासाठी दगडी जिना ठेवलेला आहे. जमिनीवरुन पद्मदुर्गावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्यास तोफेची दारू वाचविण्यासाठी दर्या दरवाजाच्या उजवीकडील तटबंदीच्या चर्चेत गोळाफेकीचे यंत्र होते. सद्या हे यंत्र नाहीसे झाले असून तटातील कड्या शिल्लक आहेत. सद्या गडावर ४०-५० तोफा असून काही गड पहाण्यास येणाऱ्या पर्यटकांनी खाली लोटून दिलेल्या आहेत.

अशाप्रकारे पद्मदुर्ग भ्रमण पूर्ण झाले. पडझड झालेला असूनही आपणास त्याचे बांधकाम पाहून अंदाज येतो की किल्ला किती मौल्यवान होता.

**हेमंत अरुण** (पृष्ठ २१)
नालासोपारा.
भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२८,
९२२०६९९९५७

## भारतीय नारी

नसे भेद वय प्रांत वा रंग जात,
किशोरी युवा वृद्ध वा नवजात.
स्वशक्तीने गर्जवू कार्यकक्षा,
एक दिलाने घेऊ उच्च ज्ञानदिक्षा.
भूमातेच्या आपण साऱ्या लेकी,
ध्येयसिद्धी आपल्या नशिबी लेखी.
कामे करुन करुन दमल्या भागल्या,
अखंड सांजवातीत तेवत राहील्या.

काव्यरचना (पृ. ३६६)

**कुमुद मराठे - डोके**
ठाणे. फोन : २५८८१६५५

कथा -

# सुनिती

## नियतीच्या नैसर्गिक नीतीचे रहस्यमय कोडे !

डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०)

ठाकूर सरांना स्वर्गवासी होऊन चार महिने उलटले. ते माझे गुरु होते आणि मी त्यांची शिष्या. मी भारतीय स्त्रीचे अंतरगं - काल, आज आणि उद्या या विषयावर प्रबंध सादर करावा, अशी त्यांची तीव्र इच्छा होती. ते कॉलेजातून निवृत्त झाले त्याच वर्षी मी एम्. ए. ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले होते. मराठी, तत्वज्ञान आणि इतिहास या विषयांचा ठाकूर सरांचा प्रगल्भ अभ्यास होता. त्यांची स्वत: जरी डॉक्टरेट ही पदवी मिळवली नसली तरी उत्तम मार्गदर्शक, प्राध्यापक म्हणून त्यांनी विश्वविद्यालयात ख्याती होती. निदान डझनभर तरी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ठाकूर सरांच्या आग्रहानुसार आणि मार्गदर्शनानुसार पी.एचडी. ची पदवी संपादन केल्याचे मला माहीत होते.

हुषार आणि अभ्यासू विद्यार्थ्याला प्रोत्साहन देऊन आग्रह करुन प्रबंध लिहिण्यास प्रवृत्त करणे, हा त्यांचा आवडता छंद होता. म्हणूनच जी जेव्हा त्यांना एम्. ए. पास झाल्याने पेढे देण्यास त्यांच्या घरी गेले तेव्हा त्यांनी मला कोठेही नोकरी न करता, प्रबंधासाठी अभ्यास करण्याचा आग्रह केला. मला मात्र तशी महत्त्वाकांक्षा नव्हती. परंतु तसे स्पष्ट न सांगता, माझ्या भिडस्त स्वभावानुसार, मी त्यांना हूं म्हटले !

... आणि त्या हुंकाराला होकार समजून त्यांनी पाठपुरावा करण्यासाठी मला अनेक निरोप पाठविले. अखेरीस भिडस्तपणे माझ्यावर मात केली. मी ठाकूर सरांच्या सूचनेनुसार त्यांनी सांगितलेल्या विषयावर प्रबंध सादर करण्यासाठी विश्वविद्यालयात नाव नोंदविले आणि मग मार्गदर्शन मिळविण्यासाठी ठाकूर सरांच्या घरी आवश्यकतेनुसार माझ्या फेऱ्या सुरु केल्या.

प्रथम प्रथम ते प्रबंध विषयासंबंधित ग्रंथ वाचून, त्यातील माझ्या उपयोगी पडणारा नेमका भाग सांगत परंतु सरांच्या अतिवाचनामुळे आणि निवृत्तीनंतरच्या ढासळलेल्या प्रकृतीचा परिणाम म्हणून पुढे त्यांची दृष्टी गेली !

तरीही त्यांनी मला मार्गदर्शन करण्याचे कार्य सुरुच ठेवले. ते स्मरणातून विशिष्ट पुस्तकांची नावे मला सांगत, वाचनालयातून ती पुस्तके त्यांच्याकडे गेल्यावर ते माझ्याकडून प्रस्तावना आणि अनुक्रमणिका वाचून घेत आणि मग विशिष्ट प्रकरणाचा सखोल अभ्यास सांगत.

ठाकूर सरांना मूलबाळ नव्हते. त्यांची पत्नीही निर्विकार चेहऱ्याची. जणु काही आनंद-विषाद, सुख-दु:ख, समाधान, तिरस्कार या भावनांच्या पलीकडे गेलेली.

..... तरीही माझ्या एक लक्षात आले की, ठाकूर सरांची दृष्टी गेल्यावर जेव्हा जेव्हा मी त्यांच्या घरी गेले तेव्हा तेव्हा, दार उघडताना सरांच्या पत्नीच्या कपाळावर बारीकशी आठी उमटल्याचे लक्षात येई. थोडा वेळ ठाकूर सरांशी संवाद झाल्यानंतर मधल्या खोलीतून ठाकूर सरांचा धाकटा भाऊ बाहेरच्या खोलीत रेंगाळून परत जात असे. त्याच्याही चेहेऱ्यावर माझ्या उपस्थितीमुळे नाराजी उमटल्याचे लक्षात येई.

मात्र ठाकूर सरांचा दृष्टिकोन उदार होता. त्यातून त्यांच्या अंधत्वामुळे, पत्नी कोणत्याही सुखाला वंचित होऊ नये असा त्यांचा सातत्याने प्रयत्न असायचा. तशात दोघांमध्ये पंधरा वर्षाचे अंतर होते ! कदाचित् त्यामुळेही असेल, सर आपल्या पत्नीला कशाचीही उणीव भासू नये यासाठी जरा अधिकच काळजी घेत असावेत.

ठाकूर सरांना चांगली नाटके आणि बोलपट बघण्याचा छंद होता. ते सवड मिळेल तेव्हा पत्नीसह नाटक आणि बोलपट बघत. त्यांच्या पत्नीलाही नाटक आणि बोलपट बघण्याची आवड निर्माण झाली. मात्र, ठाकूर सरांना अंधत्व आल्यानंतर त्यांच्या पत्नीने कधीही बोलपट नाटक बघण्याचा विषय काढला नाही !

.... ठाकूर सरांच्या संवेदनशील मनाने ही गोष्ट टिपली. म्हणून एके दिवशी त्यांनी मला, दैनिकातील नाटकांच्या जाहिराती वाचून दाखवण्यास सांगितले. मला आश्चर्य वाटले. मी म्हटले, "कशाला जाहिराती वाचायच्या, तुम्ही तर काही नाटक बघत नाही !"

"माझ्यासाठी नाही सांगत. सुनीतीने (सरांच्या पत्नीने) गेल्या कित्येक दिवसात नाटक पाहिले नाही. तू जाशील का, तुझ्या सोयीने तिच्या बरोबर नाटक पाहायला ?"

... मला खरोखरीच सवड होऊ शकणार नव्हती. पण सरांचे हळवे मन दुखविणे मला अजिबात योग्य वाटले नाही. म्हणून मी होकार दिला. त्याप्रमाणे मी "ती फुलराणी" हे नाटक सुनीतीबाईबरोबर बघितले. मात्र, नाटकाहून परतताना, मी त्यांना सांगितले की, घरकाम आणि अभ्यास यामुळे मला बोलपट किंवा नाटक बघण्यास अजिबात वेळ मिळत नाही. तसं तुम्ही केव्हा तरी सरांना सांगाल तर बरं होईल.

.... सरांनी माझी ही अडचण समजून घेतली असावी. कारण महिन्याभराने त्यांनी मला सुनीतीने सरांच्या भावाबरोबर (ते आपल्या धाकट्या "बाबा" म्हणत.) एक इंग्रजी बोलपट बघून आल्याचे सांगितले. ते म्हणाले, "तिला भाषा जरी समजली नाही

तरी कथा मात्र चांगली लक्षात आली !"

बाबा जरी पदवीधर होता तरी त्याला नोकरी-व्यवसाय करणे कधी जमले नाही. सरांनीही त्याच्यावर अर्थार्जन करण्याची कधी सक्ती केली नाही. ते म्हणत, "परमेश्वराच्या कृपेने वडिलोपार्जित उत्पन्न भरपूर आहे. कशाला त्याने नोकरी करायची ? त्याने मनाप्रमाणे स्वच्छंदी जीवन जगले तर काय बिघडते ?"

प्रथम काही काळ सुनीतीकाकूंना बाबांचा राग येई. त्याने काही तरी कमाई करावी असे त्यांना वाटत असे. दिवसभर तसे काहीही न करता बाबाला चैन तरी कसे पडते, असा त्यांना प्रश्न पडायचा... अर्थात् बाबाला त्या रिकामपणा चे काही वाटत नसे. वडील-बंधूंनी जरी त्याला स्वच्छंद वागण्याची मुभा दिली होती तरी त्याला कोणताच छंद नव्हता. त्याने कधी छानछोकीचे कपडे केले नाहीत की कुठल्या चैनीसाठी खर्चही केला नाही. आश्चर्य म्हणजे त्याला एकही मित्र नव्हता!... मग मुलींशी मैत्री करणे तर दूरच राहिले. त्याला कसली इच्छा आकांक्षाही नव्हती. म्हणूनच त्याने लग्न केले नव्हते. लग्नाबाबतही सरांनी त्याला आग्रह केला नाही. बाबाची जमेची बाजू एकच होती, त्याच्यापासून कोणालाही कसल्याही प्रकारचा उपद्रव नसे. वेळच्या वेळी जेवणे-खाणे, सांगितलेली घरकामे आवडीने करणे, अंधार होताच घरी परतणे, कधी निवांतपणी लहर लागली तर मिळेल ते पुस्तक वाचणे (साहित्यातील विशिष्ट विषयाची त्याला आवड नव्हतीच. तसंच, हाती घेतलेले पुस्तक पूर्ण वाचायची त्याची इच्छाही नसायची) दिवसा किंवा रात्री तो आढ्याकडे पहात तासन् तास बघत बसे. एका परीने तो स्थितप्रज्ञ ठरावा. पण या विशेषणातील प्रज्ञा या शब्दाचा त्याच्या बुद्धीशी दुरान्वयानेही संबंध नव्हता. त्याच्या अशा स्वभावाची सवय झाल्याने पुढे सुनीतीकाकूंना बाबा म्हणजे एक हुकमी सांगकाम्या म्हणून उपयोगी वाटू लागला.

आणि बाबाही सुनीतीकाकूंची मर्जी राखून असायचा. त्याच्या अबोल स्वभावामुळे घरात तिसरे माणूस वावरत असल्याची जाणीवही तिऱ्हाईताला होत नसावी.

...सर खरे समजूतदार. यथार्थाची जाण असलेले. "ठेविले अनंते तैसेचि राहावे" हे ब्रीद आणि त्यानुसार शांत, उदार स्वभावाचे. त्यांना विद्यादानाखेरीज अन्य छंद नव्हता! मात्र घरातील इतरांचे छंद जोपासण्याची तसेच त्यांना अधिकाधिक सुख देण्याची त्यांची प्रवृत्ती होती.

...आता खरे म्हणजे सरांना निवृत्तीनंतर विदेशाची सफर करायची इच्छा होती. पण अनपेक्षित अंधत्व आल्याने त्यांनी तो विचार सोडला. अशा स्थितीत अन्य कोणा पुरुषाने आपल्या "डोळस" पत्नीला विदेशी सफर करण्याचा आग्रह केला असता का ?

...सरांनी मात्र केवळ आग्रहच नव्हे तर आपल्या पत्नीला प्रत्यक्ष विदेश सफर घडवून आणली. एका परिचित कुटुंबाबरोबर त्यांनी सुनीतीकाकूंना इंग्लंड, अमेरिका सफर घडवून आणली.

या कालावधीत सरांची सर्व काळजी बाबा घेत असे.

विदेश सफरीनंतर सुनीतीकाकूंच्या स्वभावात एक प्रकारचा खेळकरपणा आला. आता त्या आल्यागेल्याशी दोन शब्द का होईना बोलू लागल्या. आपल्या पतीचेही त्यांना अधिकच कौतुक वाटू लागले आणि विशेष म्हणजे हे कौतुक त्या परीचितांना बोलून दाखवीत.

पण असा सुखाचा काळ फार दिवस लाभला नाही. सरांचे निधन झाले आणि परिस्थितीला वेगळे वळण लागले.

... खरं तर मला सरांच्या निधनाची वार्ताही बरीच उशीरा कळली. कारण माझ्या पीएच्.डी. चे काम झाल्यानंतर त्यांच्याकडील जाणे थांबले.

ठाकूर सरांच्या शेजारच्याच ब्लॉकमध्ये राहणारी सौ. नीलम ही माझ्या परिचयाची झाली होती. नीलमचा स्वभाव मात्र वेगळाच होता. जणू काही एकूण जगाच्या भल्याची, स्वास्थ्याची, नीतीमत्तेची काळजी वाहण्याचे काम तिचेच आहे, शेजारी पाजारी कोण येते जाते, त्यांच्याकडे काय बोलणी होतात, कसले वादंग माजतात याची तिला खडान् खडा माहिती असे. इतकेच नव्हे तर, साऱ्या बिल्डींगमधली लफडी आणि भानगडी यांची साद्यंत माहिती तिला पुरेपूर असे. कॉलेजात ती माझ्यापुढे दोन वर्ष होती. यामुळे कॉलेजातील प्राध्यापक-प्राध्यापिका, विद्यार्थी-विद्यार्थीनी ह्यांची कुलंगडी तिला माहीत होती. प्रसंगपरत्वे त्याचा ती उल्लेख करी. ठाकूर सरांबद्दलही ती कधी चांगले बोलली नाही.

एकदा ती मला म्हणाली, "ठाकूर सर तुला इतके उदार अंतःकरणाचे वाटतात. पण त्यांच्या या वागण्यामागेही एक रहस्य आहे. घरी पत्नीशी आदबीने, उदारपण वागणारे ठाकूर सर कॉलेजातील प्राध्यापिका आणि विद्यार्थिनींशी मात्र वेगळ्याच भूमिकेतून वागत असल्याचा मला अनुभव आहे.

... वास्तविक तिच्या या वाक्यावर मी उत्सुकतेने तिला ठाकूर सरांच्या कॉलेजातील कर्तबगारी विषयी विचारेन अशी तिची अपेक्षा होती. नीलमची प्रवृत्ती मला अजिबात मान्य नसल्याने मी तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. ठाकूर सरांसारख्या उदार हृदयी व्यक्तीसंबंधीही नीलम वाईट बोलते! त्यामुळे नीलमविषयी माझे मत अधिकच वाईट होते.



Marathe Pratishthan

अशी ही नीलम मला परवा रस्त्यात भेटली. मी बस स्टॉपवर क्यूमध्ये उभी रहात होते आणि ती आलेल्या बसमध्ये चढत होती. त्या किंचित भेटीतही तिने मला ओरडून सांगितले, "रात्री ९ वाजता फोन कर." मला थोडे आश्चर्य, आणि अधिक उत्कंठा वाटली. म्हणून तिच्या सूचनेनुसार रात्री ९ वाजता मी फोन केला.

"ठाकूर सरांकडे कधी गेली होतीस?" तिने विचारलं.

"अलिकडे इतक्यात गेलेच नाही. काय ग, विशेष काय?" मी विचारले.

"अग, ठाकूर सर वारले. चार महिने झाले. पण या चार महिन्यात मिसेस ठाकूर मात्र फार बदलल्या आहेत." निलम म्हणाली.

"म्हणजे काय ग?"

नक्की बोध न झाल्याने मी विचारले.

"हे बघ फोनवर मी अधिक काही सांगत नाही. तू त्यांच्या घरी एकदा सवडीने जाऊन येच. म्हणजे समजेल... नंतर केव्हा तरी मलाही सवडीने भेट."

...आणि म्हणून अखेरीस मी सवड काढून ठाकूर सरांच्या पत्नीला भेटण्यासाठी त्यांच्या तिसऱ्या मजल्यावरील ब्लॉकसमोर पोहोचले.

दार नेहमीप्रमाणे बंद होते. पण दारावरील रंगरंगोटी अत्यंत कलापूर्ण, आकर्षक आणि चित्तवेधक होती. मुख्य म्हणजे दोन दारांवर-दाराच्या एका फळीवर अत्याधुनिक कलाकृती आहे. अमूर्त-रूपात बघणाऱ्याच्या दृष्टीस एक लंबगोलांची साखली दिसावी. अर्थात् हे लंबगोल टोकाशी एकमेकात गुंफलेले होते. मला तर मत्स्यालयातील लहान मोठ्या मासोळ्यांची आठवण झाली. सर्वात वर एक छोटी मासोळी. तिचे शेपूट थोड्या अधिक मोठ्या मासोळीच्या तोंडात असलेले, आणि त्या मासोळीचे शेपूट अन्य मोठ्या मासोळीच्या तोंडात. अशी मासोळ्यांच्या आकाराची जणु चढती भाजणी होती. अर्थात् दुसऱ्या कुणा बघणाऱ्या पुरुषाला आणखी काही वेगळ्याच गोष्टीचा भास व्हावा!... ती लंबगोलाकृती भावना उद्दिपित करणारी वाटली!!

आणि दुसऱ्या फळीवरची दारावरची बेल, ही बेल (घंटी) वाटतच नव्हती. तर तिथे होता एक बदामी रंगाचा गोलार्थ... आणि मधोमध होते एक लालचुटूक मखमलीचे बटन... आणि विशेष म्हणजे त्या अर्धगोलाखाली बारीक रोमन लिपीत लिहिले होत, "प्रेस मी!"

...मी खरोखरच ते बटन दाबणार इतक्यात माझ्या मनात संभ्रम निर्माण झाला की, आपण ठाकूर सरांच्याच ब्लॉकपाशी उभे आहोत की दुसऱ्या कुणाच्या! म्हणून मी ब्लॉकवरचा नंबर बघितला, बी/३०२. म्हणजे हा ठाकूर सरांचाच ब्लॉक होता. फक्त त्याचे बहिरंग भडक, मॉडर्न आर्टने कल्पनेपलिकडे बदलले होते!!

...मग मात्र मी निश्चिंतपणे ते लाल चुटूक बटन दाबले. त्यावेळी माझ्या अंगठ्याला मुलायम स्पर्शाचे सुख तर लाभलेच पण त्याबरोबर "लवबर्ड्स च्या नाजूक चिवचिवाटीच्या सुंदर सुरावटीने मनही रोमांचित झाले.

दार लगेलच उघडले गेले नाही. मला वाटले की काकू झोपल्या असतील. म्हणून मी पुन्हा बेल वाजविली. थोड्या वाळात काकूंनीच दार उघडले.

...त्यांना पाहून माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना! त्यांनी चक्क स्लीव्हलेस मॅक्सी घातली होती. केस विसकटलेले होते. काजळ घातलेले डोळे सुस्तावलेले होते. मात्र चेहरा पूर्वीपेक्षा किती तरी प्रसन्न आणि सतेज वाटत होता. त्यांच्या वेशभूषेतही आमूलाग्र बदल झाला होता. मॅक्सीचा सुटलेला पट्टा बांधत बांधत त्या मला हसत हसत म्हणाल्या, "या ना!"

...मला त्यांचे हे स्वरूप वेगळे आणि विस्मयकारक वाटले. त्यांचे हे बिनधास्त स्वरूप पाहून प्रथम मी गोंधळले.

काकूंनी मला कोचावर बसावयास सांगितले. "चहा घेऊन येते" म्हणत, त्या आतील खोलीत गेल्या. कोचासमोरच्या टेबलावर टी.व्ही. होता. कोचावर बाजूच्या टेबलावर रंभा, मेणका, अप्सरा अशी बरीच मासिके पडलेली होती. त्यातील एक अंक चाळत असताना, आतील खोलीतील ब्लॉकच्या दरवाज्यातून बाहेरील प्रवेशद्वाराकडे कोणी गेल्याची चाहूल लागली. म्हणून मी बघितले तर, मला एक प्रौढ, उंच, जाडजूड शरीरयष्टीचा, टक्कल असलेला पाठमोरा पुरुष दिला. ब्लॉकचे दार आपोआप लागले.

...काकू एका सुबक नक्षीदार ट्रेमध्ये चहाची किटली आणि दोन पेले घेऊन आल्या. सोबत एका डिशमध्ये वेफर्स, फरसाण आणि बिस्कीटे. हसतच त्यांनी आग्रह केला. "आधी ही डिश संपवायची मग त्यावर चहा घ्यायचा. गार होऊ नये म्हणून किटली आणली." त्यांच्या या सुहास्य अगत्याने मी भारावून गेले . त्यावेळी मनात आले. काकू किती अंतर्बाह्य बदलल्या! पूर्वी ठाकूर सरांनी सांगून सुद्धा त्यांनी कधी माझ्यासमोर चहाचा कप ठेवला नव्हता. त्यावेळी त्यांचा पोशाख म्हणजे नऊवारी लुगडे त्यांचेही रंग ठरलेले. निळा आणि हिरवा. त्यावर सतत पांढऱ्या रंगाचेच ब्लाऊज. चेहरा निर्विकार. कळसूत्री बाहुलीसारखे चालणे बोलणे.

त्या पार्श्वभूमीवर काकूंचे आजचे दर्शन आणि आनंदी अगत्याचे वागणे मला प्रकर्षाने जाणवले.

हा स्वागतार्ह बदल कसा झाला याबद्दल माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले.



Marathi Pratishthan

...[illegible] आठोळ्यावर काकूंनी मला प्रश्न विचारले, "काय ग, पुढे काय ठरवले?... कोणत्या नोकरीसाठी प्रयत्न करतेस?"

काकू माझ्याकडे निरखून बघत होत्या.

"मी सध्या [illegible] आहे. दोन-तीन [illegible] इंटरव्ह्यू झालेले आहेत. आता [illegible] आहे."

"एक सांगू तुला?" काकूंनी माझ्याकडे [illegible] दृष्टिक्षेप करून विचारले. परंतु माझ्या उत्तराची वाट न पाहता त्यापुढे मला म्हणाल्या, "नोकरीपेक्षा लग्नासाठी वरसंशोधन सुरु कर. आणि फार चिकित्सा न करता, लग्न कर. मुलीसाठी, संसारसुखापेक्षा दुसरे काही महत्त्वाचे नसते. नोकरीच्या मागे लागू नकोस. नोकरीची ती [illegible] आणि वाढते वय यामुळे तुला असलेली [illegible] नष्ट होईल आणि मग जो तुला पसंत पडेल त्याला तू पसंत पडणार नाहीस. कारण पुरुषांना ते कितीही सुधारलेले, शिकलेले असले तरी शिकलेल्या मुलीपेक्षा सुंदर मुलगी अधिक पसंत पडते. कारण त्यांना सुंदर मुलीच्या सहवासात मनसोक्त संसारसुख मिळते... आणि तुझ्या [illegible] विचार केला तरी, आणखी दोन-तीन वर्षांनी लग्न करण्यापेक्षा, सध्या लवकरच केलेले हितकर ठरेल. तुझ्या मुसमुसत्या तारुण्याचा अधिक कालापव्यय होऊ देऊ नकोस. अगदी स्पष्ट सांगायचं म्हणजे, तुझ्या बहुमोल तारुण्यातील [illegible] वाया गेलेला दिवस, तुला आयुष्यात पुन्हा कधीही उपभोगता येणार नाही!"

काकू नोकरी मिळाल्यानंतर मी लग्न करीन, तेव्हा संसारसुखाचा उपभोग घेता येईलच की. मी त्यांना माझी भूमिका सांगितली.

"मी आहे ना..." काकू पुढे म्हणाल्या, "[illegible] संपलेले दिवस तुझ्या एवढ्या सुखाच्या काळ कमी नाही करीत? मला हे सत्य फार उशीरा कळले. आमचे लग्न होऊनही, मूलबाळ न झाल्याने, माझं जीवन नीरस झालं. त्यातूनही ह्यांचे पुरुषी [illegible] मला सुखावू शकले नाही. आता आठवते की त्यांनी मला अन्य सुखे देण्याचा भरपूर प्रयत्न केला. स्वतःला [illegible] आल्यावरही त्यांनी मला परदेश प्रवास घडविला. पण त्यामुळे माझ्यातील "स्त्री" ची भूक काही भागली नाही.

...फार फार उशीरा मला हे अनुभवास आले आणि त्यामुळे आता आयुष्याच्या उतरंडीवर मिळेल तितके स्वच्छंदी जीवन मी कवटाळण्याचा प्रयत्न करीत आहे.

...मी काकूंकडे आश्चर्यचकीत होऊन बघतच राहिले. त्या मात्र शून्यात दृष्टी लावून जणू काही स्वतःशी मोठ्याने बोलत होत्या. माझ्या मनात काकूंच्या भूतकालीन उदास जीवनाबद्दल सहानुभूती निर्माण होऊ लागली.

तुझ्या सरांच्या निधनानंतर कॅन्सरच्या आजारात मात्र मला पूर्वायुष्यात जे मी गमावले ते सापडले. त्या विशिष्ट परिस्थितीत फार विचारपूर्वक नव्हे तर परिस्थितीवश मूलभूत भाव जागृत झाल्याने [illegible] माझी सलगी वाढली.

पण सांभाळणाऱ्या बाबाची संगत मला अपुरी वाटली. स्त्रीमनाला पूर्ण सुख देण्याकरिता अधिक आग्रही मनधरणी करणारा, कल्पक, रसिक योगायोगानेच प्रधानांच्या रूपात भेटला. त्यांचा आग्रही अनुनय मला भावला. त्यांनी आमच्या प्रवेशद्वारापासून अंतरंगापर्यंत कलात्मक रसिकतेचा बहर आणला. तू आता इथे आल्यावर टक्कल असलेले गृहस्थ बाहेर गेले, तेच श्री. प्रधान होय.

बस्स, असे हे घडले. चूक का बरोबर याचा मी विचार केला नाही. सरत्या वयात तशी आवश्यकताही वाटली नाही. बाबा आणि प्रधानांनी माझ्यातील स्त्रीची प्राथमिक भूक भागविली, आदर्श महिला मंडळाने माझे बाह्य रूप आकर्षक केले.

ह्या दोन्ही गोष्टी सध्या माझ्या जीवनाच्या अविभाज्य भाग बनलेल्या आहेत. हा सर्व खेळही थोड्या अवधीत संपणार याची जाणीव आहे. "ना खेद ना खंत" अशा अवस्थेत मी सुखांत आहे.

सुनीतीकाकू बोलायच्या थांबल्या. थोडावेळ भिंतीवरील सरांच्या फोटोकडे त्या बघत राहिल्या. काही क्षणांनी भानावर येऊन त्या मला हसत-हसत म्हणाल्या. "मूळ मुद्दा म्हणजे तू शक्य तितक्या लवकर विवाहबद्ध व्हावेस हा आहे. तू हुशार आहेस, समजूत समजशीलच. पुन्हा कधी वेळ काढून आलीस तर मला आवडेल."

मी त्यांचा निरोप घेऊन घरी परतले. त्याचवेळी मी नीलमला फोन करून सुनितीकाकूंना भेटून आल्याचे सांगितले.

तिने उतावीळपणे विचारले, "आलं ना लक्षात? सुनितीकाकू किती बदलल्या आहेत ते?

...उथळ मनाच्या चटोर आणि दुसऱ्यांच्या भानगडी हुंगण्यातच आनंद घेणाऱ्या नीलमला मी माझे मत कसे सांगणार? "हूं" म्हणून मी फोन बंद केला.

आता विचारी आणि अनुभवी वाचकांनी सुनिती ठाकूर यांची व्यथा आणि वास्तविक कथा आपल्या दृष्टिकोनातून समजून घ्यावी, इतकाच हेतू. कारण चांगले-वाईट आणि पाप-पुण्य यांच्या अंतिम आणि चिरस्थायी व्याख्या अजून निर्माण व्हायच्या आहेत, हे खरे नाही काय?

डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर मराठे

(पृ. क्र. १२०)



Marathe Pratishthan

# VISITS TO SULTANATE OF OMAN

श्री. रमाकांत विद्वांस (पु. ६२३)

The Sultanate of Oman is a country in the Middle East, on the southeast coast of the Arabian Peninsula. It borders the United Arab Emirates in the northwest, Saudi Arabia in the west and Yemen in the southwest. The coast is formed by the Arabian Sea in the south and east, and the Gulf of Oman in the northeast.

Present Ruler of Oman - Sultan Qaboos bin Said - the only son of Sultan Said bin Taimur (1932-1970) was born in Salalah in Dhofar on 18th November, 1940. Sultan Qaboos received his primary and secondary education in Oman. When he reached the age of 16, his father sent him to a private educational establishment in England. At the age of 20, he entered the Royal Military Academy at Sandhurst. After passing out of Sandhurst, he joined a British Infantry battalion on operations in Germany for one year and also held a staff appointment with the British Army. After his military service, Sultan Qaboos studied local government subjects in England and, after a world tour, returned home to Salalah where he studied Islam and the history of his country. Upon his accession to the throne on 23 July 1970, he moved to Muscat where he declared that the country would no longer be known as 'Muscat and Oman', but would be united as the 'Sultanate of Oman'. Sultan Qaboos has been a man of great foresight and a great reformist. His philosophy is reflected in his thinking where he says :"I am working for Oman - the country and its people...for me it is a delight to see my country and my people in the situation I imagined from the very first day I assumed power. I feel that I am a man with a mission rather than a man with authority."

Oman under Sultan Said bin Taimur, who came to power in 1932, experienced decades of international isolation, a society run along feudal lines and a highly underdeveloped country. Sultan Qaboos Bin Said opened up the country, embarked on economic reforms and boosted spending on health, education and welfare. Under the leadership of Sultan Qaboos, Oman today has an excellent health service, a clear road network and many educational establishments for girls and boys, from nursery levels, to university degrees.

The oldest independent state in the Arab world, Oman is one of the more traditional countries in the Gulf region. Oman holds an exceptional position among all the Persian Gulf countries in terms of Basic Law of the State promulgated in December 1996, which guarantees the freedom of worship to all its inhabitants, irrespective of their religious beliefs. Such liberal policy of the government has made it possible that presently there are two Hindu temples where congregations are held regularly. One of these temples is more than hundred years old. The Hindus have been granted the rights of cremation as per their religious rites. Occupying the south-east corner of the Arabian peninsula, it has a strategically important position at the mouth of the Gulf. Oman is a long-standing US ally; there is a free trade agreement between the two countries

In the period from 1965-1985 many middle-eastern countries saw tremendous economic growth. This growth was caused by the dramatic rise in oil prices, As oil prices rose to new highs, most Oil-producing states (especially large producers such as Saudi Arabia, Iran, Iraq, Kuwait, the United Arab Emirates, and Qatar) benefited directly in the form of high export earnings. However, prudent Sultan Qaboos maintained development on a low key.

One fine day, in 1980, the Hindustan Construction Co. Ltd., where I was working, received a telex message from a leading business house from Oman requesting HCC to depute someone for discussions and for taking on the spot decision regarding formation of joint venture. The business house was owned by a "His Excellency" [H.E.] who was a member of the council of Ministers. As per Omani Laws, Ministers were permitted to have own business.

Because of my experience in Joint Venture [JV] Formation, I was deputed for the meetings. After I checked into my hotel, the General Manager and the Financial Advisor deputed by H. E. called on me and apprised me about the topic of discussions. They informed me that their construction wing which was controlled by Lebanese was making a loss over the past few years and that they were looking for a JV Partner to improve the operations. They told me that I would be meeting H.E. at his villa for further discussions in the evening.

The villa was nothing less than a palace with fountains and flowing streams. After exchange of courtesies, H. E. told me that he had gone through all the literature and financial documentation of HCC and wanted to know my own impressions about HCC. This was a very tricky question and here my business management skills came to my help. I told H.E. that an organization is known by its culture and narrated to him as to how, just before the Sino-Indian war of 1962, HCC had completed Railway Bridges in Assam even before signing the official contract as the bridges were of strategic

Marathe Prakashan

importance. I also told him how, after the Panshet Dam Disaster, HCC moved in overnight, to commence restoration of infrastructure in Pune. H.E. expressed that he was greatly impressed. We then got down to real business.

I told H.E. that since his construction wing was in red for the past few years, It would not be right to expect capital participation from HCC unless HCC was given an opportunity to carry out in-depth studies. I therefore suggested to go step by step. As a first step, HCC would depute a couple of senior management executives to Oman for a period of about three months. They would then submit a report on their findings with suggested remedial measures to be carried out within the next three months. Further trial would be carried out within the next six months and at the end of this period, options regarding capital participation and formation of JV could be discussed. I further clarified that all this exercise would be for a fee. All executives of HCC were considered as profit centers and the compensation to be paid to HCC would include all expenses and loss of profit due to absence of HCC's executives. I told H.E. that I would send an official proposal as soon as I return to India and I also clarified that my proposal is subject to approval by the Board of Directors of the HCC and the Government of India. H.E. expressed that he appreciated the proposal and promised to get back to HCC soon, as the matter was also under discussions with some other organizations.

The next day, I called on the Indian Charge-de-affairs who confirmed that the business house I was dealing with was highly reputed and rated in Oman. He enquired as to where I as staying and I told him that I was booked at "AL-falaJ" which was the only first-class hotel in the city. He told me that the hotel staff physically checks the rooms occupied by Indians before they leave as Members of ad Indian Political Delegation has carried away pillows and quilts when they left the hotel. I told him that I was a VIP Guest at the hotel as I was booked by H.E. who has financial interest in the hotel.

Our arrangement with H.E. for the JV did not work out. However, H.E. agreed to be HCC's sponsor for future projects and I became a very good personal friend of H.E.

Sultanate of Oman extends from its Capital City Muscat in the north and Port of Salalah in the south. Muscat is almost in the same parallel as Ahmadabad and Salalah is almost in thr same parallel as Ratnagiri. Coastal Oman therefore has a climate similar to that of Coastal India.

My next visits to Oman were in connection with a tender for construction of a Dam near Port of Salalah in southern Oman. I had to meet the Minister of State for requesting for extension of time for submission of the tender. Our sponsor's representative accompanied me for the meeting. He told me that in Oman, Members of Sultan Qaboos's Council of Ministers are well educated and experienced in their fields. Sultan's philosophy is that anyone who has to deal with government administration has to be trained in the field. The Irrigation Minister was a graduate engineer from USA and had worked the Tennessee Valley Authority.

r the tender a bid bond was required from a local bank. I approached local bankers and they agreed to provide the necessary bid bond, at a price, after getting a back-up guarantee from the State Bank of India. The market was so competitive, that one banker agreed for make available the bid bond for free on an understanding that HCC would maintain a bank account with the bank. The banker was so helpful that he instructed his branch office at Salalah to help in visiting the worksite and collect prices of local materials etc. for preparation of the tender. All this was totally contrary to the situation in India where the banking sector was monopolistic.

Oman in the eighties was still a developing country. The Airport was small. Roads were narrow. Muscat had very few high-rise buildings. Roads were barren and had no arboriculture. I had an occasion to visit Oman again in 2003. Oman now is totally different. Cities have posh residential complexes. All major super-market chains have their presence. Today's Oman has very wide roads capable of high-speed traffic. Medians are covered by beautiful flower plants. Side slopes in cuttings are covered with green creepers. Oman now has many parks. It is said that because of all this greenery, Oman has started receiving regular rains. A desert country has been partially converted into Garden of Eden. Oman today has an excellent health service and many educational establishments for girls and boys, from nursery levels, to university degrees.

श्री. रमाकांत विद्वांस (पृ.६२३)

## भाऊचा धक्का

**मुंबईची डरकाळी दिल्लीत विरली, कसनुसे हसू चेहऱ्यावर सजले.**
**नको नको म्हणतानाही, अवजड ओझें गळ्यात पडले.**

... भाऊ (सदानंद विष्णु मराठे) (पृ.क्र.५०७)
नीलमणी, ३२, शिवाजी पार्क, दादर, मुंबई. दूरध्वनी: ०२२-२४४४८६४८

Marathe Pratishthan

# वाचकांचा पत्रव्यवहार

मा. संपादिका - हितगुज दि. ७/०५/२०१४

स.न.वि.वि.,

जून २०१४ च्या अंकासाठी एक जाहिरात, भारतीय नारी- कविता, अभंग नृत्यखळी, ठाणे याथील कार्यक्रमाविषयी मजकूर सोबत दोन स्वतंत्र चेक पाठवित आहे.

३ मे काशिनाथ घाणेकर मिनी हॉल दु. ४ ते ७ असा तीन तासाचा कार्यक्रम फार सुंदर झाला. त्याचा वृतांन्त व फोटो मराठे परिवार साईटवर टाकले आहेत. कुचिपुडी ही आंध्रची शास्त्रीय नृत्यशैली असून चंद्राबाबू नायडू, भूतपूर्व मुख्यमंत्री तसेच मा. स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी हे कार्यक्रम स्वत: उपस्थित राहून पाहिले. त्यांचा गौरव केला. मराठी संताच्या अभंगावर शास्त्रीय नृत्यातून सादरीकरण हा अभिनव प्रयोग प्रेक्षकांनी खूप उचलून धरला आहे. दाद चांगली मिळते. दादर येथे निधि संकलनासाठीही तो ठेवता येईल. असो एखाद्या पुढील कार्यकारिणी सभेत सी.डी. बघून सर्वानुमते काय ते ठरवावे.

कळावे,

आ.वि. (माहेरवाशीण)

**कुमुद सुदाम मराठे - डोके**

(पृ.क्र. ३६६)

पुणे, २/०४/२०१४

मा. संपादिका, स.न.वि.वि.,

"हितगुज"चा मार्च २०१४ चा अंक वाचला. खूप आवडला.

अंकात चुकीची छपाई आढळली. कदाचित अक्षरजुळणीनंतर मुद्रित तपासणी नीट झालेली नसावी.

मोहन मराठ्यांचे "वायनाड केरळ" प्रवास वर्णन अतिशय आवडले. त्यांना मी लगेचच फोन करुन पसंती कळवली.

इतर आवडलेले लेख म्हणजे, "भ्रम" ही कथा, "सावरकरांनी क्षमायाचना केली नाही", "मत्सर षडरिपु", रमाकांत विद्वांसांचा लेख उत्तम इंग्रजी भाषेत लिहिला आहे. माहितीपूर्ण आहे. पण या लेखात मद्य आणि मद्यपान या विषयी जे लिहिले आहे त्याविषयी माझ्या मते आपल्या "हितगुज" मध्ये हे यावयास नको आहे. कारण मद्यपान हे सर्व दृष्टीने नुकसानकारक आहे. दारुबंदी कायदा आता सौम्य स्वरुपात का होईना पण अस्तित्वात आहे. मद्यपी जाहिरात ही माझ्या उत्तम माहितीप्रमाणे अजुनही कायदेशीर नाही. या लेखात जाहिरात आहे असे नाही. पण हे नको होते असे वाटते.

१०० वा अंक कसा असावा याविषयी लिहायचे तर डिसेंबर १४ मध्ये प्रसिद्ध होणारा हा अंक शक्यतो नोव्हेंबरमध्ये दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध करावा का ? पण आपण दिवाळी अंक प्रसिद्ध करीत नाही. तरी सुद्धा इतर सुप्रसिद्ध व्यक्तींचे लेख त्यात असावेत. कविताही असाव्यात असे मला वाटते. गेल्या १०० अंकाचा एकित्रत आढावा त्यात असावा.

कळावे. श्रीराम व्यंकटेश मराठे, (पृ.क्र. ३५/४३)

२/६, चंद्रलोक नगरी, डहाणूकर कॉलनी,

कोथरुड, पुणे - ४११ ०३८

**मा. संपादिका - हितगुज**

स.न.वि.वि.,

मार्च २०१४ हा अंक पोस्टाने मिळाला, धन्यवाद !

डिसेंबर २०१४ च्या अंकाचा शतकोत्सवी कार्यक्रम व प्रत्यक्ष अंक कसा असावा, याबाबत आपले विचार, कल्पना कळवाव्यात असे कळविले आहे. त्याविषयी कार्यक्रमात नाविन्य काय आणता येईल ? अंक आकर्षक व सुबोध नेहमीप्रमाणे कसा होईल त्याचा विचार आपण सर्वांनी करु या.

शतकोत्सवी अंक - आकर्षक रंगीत मुख्यपृष्ठ, प्रवासवर्णने, कविता, एखाद्या पुस्तकाचा (वाचलेल्या) अवलोकन विनोदी किस्से, कथा यांच्या लेखन-स्पर्धा.

सादरीकरणात - स्टेजमागे, पुढे टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनविणे, पाककृती स्पर्धा, एखाद्या विषयावर प्रचार-फलक (पोस्टर कॉम्पीटीशन) उदा. मुलगी वाचवा अभिनय, हुंडाविरोधी प्रचार, लाचखोरीला लगाम इ. एकपात्री अभिनय स्पर्धा, नृत्य, गायन स्पर्धा आपोआप सरस कार्यक्र जमून जाईल.

कार्यक्रमाच्या जागी पुस्तके, हस्तोपयोगी वस्तूंची विक्री, बॅनर, बॅका, उत्पादने यांची ज्यायोगे जाहिरातीतून उत्पन्न मिळेल.

मराठी मातीचा टिळा-रवि जाधव, त्रिवार जयजयकार - अर्जना, दिनेश, सरव्यारे - केतन पटवर्धन यांचे दर्जेदार कार्यक्रम निधिसंकलनासाठी उपयुक्त ठरतील. वि. सू. स्पर्धा सर्वांसाठी खुल्या असाव्यात स्पर्धा शुल्क प्रत्येकी किमान १५०/- रु. आकारावे.

अच्युत गोडबोले, प्रविण दवणे, मंगेश पाडगांवकर, भाऊ मराठे यांच्या किंवा कलाकरांच्या मुलाखती नवोदितांनी घ्याव्यात.

कल्पनेचा वारु फारच धावतो आहे. पेन थांबवून त्याला लगाम देत आहे.

आ.वि. (माहेरवाशीण)

कळावे

**कुमुद सुदाम मराठे - डोके**

(पृ.क्र. ३६६)

**माझा मुलगा सुधांशु व**
**सूनबाई सौ. राखी (संचिता)**
**यांचा ५ मे रोजी**
**लग्नाचा १४ वा वाढदिवस झाला**
**त्याबद्दल त्यांच्या वैवाहिक जीवनास**
**व पुढील यशस्वी**
**कारकीर्दीस खूप खूप शुभेच्छा !**
**आई कुमुद सुदाम डोके (मराठे माहेरवाशिण)**
**जोशी, गोखले, राणे, मराठे, कानडे, वैद्य परिवार**

Marathe Pratishthan

# १० वी, १२ वी, पदविका, पदवी व अन्य परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

गुणवत्ता पारितोषिके २०१३-२०१४ साठी ३० जुलै पूर्वी अर्ज पाठवावे.

१० वी (किमान ७०% गुण), १२ वी (किमान ६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक - स्पर्धा परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. अभ्यासेत्तर क्षेत्रात किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

याशिवाय कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पारितोषिकेही देण्यात येतात :

**१. कै. कु. अनिता खांबेटे पारितोषिके :** इ. १० वी, १२ वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७ वी) या परीक्षात मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या प्रत्येकी रु. २५०/-

**२. सौ. सुलभा अनंत प्रायोजित पारितोषिके :** इ. १० वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारात सर्वाधिक गुणांसाठी रु. १००/-

**३. प्रभाकर गणेश प्रायोजित पारितोषिक :** रु. ५००/- पात्रेचे निकष :

अ. तांत्रिक विषय देऊन १० वी च्या परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुण

ब. १० वी ला तांत्रिक विषय नसले तरी १० वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर इंजिनियरिंग यासारख्या आभियांत्रिकीच्या कोणत्याही विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १० वीच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी.

क. मात्र १० वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यात यावा.

**४. शालिनी धुंडिराज प्रायोजित वैदिक शिक्षक अथवा हिंदूधर्माचा प्रचार यासाठी** - वार्षिक पुरस्कार रु. १०००/-

**५. शैक्षणिक कर्ज -**

विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनिअरिंग शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज (रु. ३०,००० पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज यासाठीचे अर्ज ३० जुलै २०१४ पर्यंत प्रतिष्ठानकडे पाठवावे. अर्ज फक्त २०१३-२०१४ या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे.

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत अर्जाला जोडून पाठवावी, नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये. खास बक्षीस योजनेखाली (उदा. हिंदी अथवा तांत्रिक विषय) अर्ज काला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.

पत्रोत्तर देण्यासाठी अर्जात पर्ण पत्ता लिहावा.

**शैक्षणिक, वैद्यकीय मदत**

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करुन अशी मदत दिली जाते.

बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजरासाठीही खास निधीतून (विशिष्ट हेतू निधी) मदत मिळू शकते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना साहाय्यासाठीही कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

**अर्ज पाठविण्याचा पत्ता :**

**श्री. हेमंत अरुण मराठे, कार्यवाह मराठे प्रतिष्ठान**

बी-१०२, शांतीनाथ अॅव्हेन्यू, चक्रधर नगर, नालासोपारा (प.) - ४०१ २०३, जि. ठाणे, मोबाईल : ९८२२८४७१२०

त्रैमासिक "हितगुज" हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल: (१) sitaram_khambete@yahoo.com (२) marathepariwar@yahoo.co.in ◎ वेबसाईट : www.marathepratishthan.org



Marathe Pratishthan

# संवाद - कुलबांधवांशी

नमस्कार, कुलबांधव आणि भगिनींनो,

मार्च २०१४ चा अंक प्रकाशित झाल्यानंतर गेल्या तीन महिन्यांमध्ये बऱ्याच घटना आपल्या देशात घडल्या. यामध्ये महत्वाचे म्हणजे पाच वर्षांतून येणाऱ्या लोकसभेच्या निवडणूका. खरतर हा एक लोकशाहीमधील उत्सवच आहे. माझ्या आठवणीमध्ये आणिबाणीनंतरच्या निवडणूकीमध्ये जसा जोश होता. तसाच जोश यावेळी दिसून येत होता. प्रचारसभा, मुलाखती, रॅली यांनी देश ढवळून निघाला. मात्र यामध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे सामान्य माणसांचा (नागरिकांचा) निरुत्साह! आपले नांव मतदारयादीमध्ये आहे की नाही. हे वेळेवर तपासले गेले नाही. आपला हक्क म्हणजे मत देणे, याबाबत देखील लोकांमध्ये म्हणावी तशी जागरुकता नाही. मी एकटा मत देऊन काय बदल होणार आहे? अशी वृत्ती लोकशाहीला पर्यायाने समाजाला घातक आहे. ज्याप्रमाणे मतदानाचे बाबतीत हा निरुत्साह दिसतो त्याचप्रमाणे सामाजिक कामांमध्येही दिसतो. म्हणूनच आपण सामाजिक संस्था चालवतो त्यामध्ये लोकांचा जो सहभाग आवश्यक असतो. तो मिळत नाही. आपली मराठे प्रतिष्ठान ही त्याला अपवाद नाही. लोकांनी सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सहभाग वाढवणे, आवश्यक आहे. खरेतर आपण सर्वांनी एकत्र येणे. विचारांचे आदान प्रदान करणे. एकमेकांच्या संपर्कात राहाणे. हे निरोगी समाजाचे लक्षण आहे. असो !

२३ मार्च २०१४ रोजी, साखळी, गोवा येथे मराठे, गोवा परिवाराचे संमेलन होते. आम्ही मुंबईहून चार कार्यकारीणी सदस्य उपस्थित होतो. तेथे खरंतर परिक्षांचा हंगाम असूनही, साधारण ५० ते ६० जणांची उपस्थिती होती. यामध्ये महिला तसेच युवक-युवतींचा सहभागही उल्लेखनीय होता. फक्त सहभागच नाही तर या तरुण वर्गाने आणि महिलांनीच संमेलन यशस्वी केले. त्यामध्ये चर्चा तर फारच रंगल्या. सविस्तर वृत्त तेथील प्रतिनिधी देतीलच. असा उत्साह, प्रतिसाद मुंबईमध्ये का बरे मिळत नाही? आपणच याचे उत्तर देऊ शकाल, विचार करा.

सध्याा मोबाईल, इंटरनेटमुळे जग फार जवळ आले आहे. आपण प्रत्यक्ष न भेटताही चॅटींगच्या माध्यमातून एकमेकांशी कायम संवाद ठेऊ शकतो. मात्र त्याबरोबर एकमेकांशी भेटीगाठी मात्र कमी झाल्या आहेत. या सर्व नवीन संसाधनाचा वापर फार जबाबदारीने करणे गरजेचे आहे. याच्या माध्यमातून एकमेकांशी चर्चा करणे व त्याचबरोबरीने प्रत्यक्षात भेटण्यासाठी, सभा, संमेलने घेणे फार गरजेचे आहे. जेव्हा शक्य असेल तेव्हा प्रत्यक्ष भेटून अन्यथा या संपर्क माध्यमांद्वारे आपण एकमेकांच्या संपर्कात असणे गरजेचे आहे.

आपल्या हितगुजचा १०० वा अंक डिसेंबर २०१४ मध्ये प्रकाशित होणार आहे. त्याचा प्रकाशन समारंभ मुंबईमध्ये झोकात करण्यात येणार आहे. आपण आपला वेळ अवश्य काढून ठेवा. तारखेकडे लक्ष ठेवा. आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा आणि आमचा हुरुप वाढवावा. याचबरोबर या अंकासाठी आर्थिक पाठबळ असणे फार जरुरीचे आहे. तेव्हा आपण शक्य होईल तितकी मदत देणगीच्या मार्फत किंवा जाहिरातीद्वारे करावी ही कळकळीची विनंती. कळावे. आपला संवाद असाच उत्तरोत्तर वृद्धींगत होईल. पुढील अंकामध्ये भेटूच...

**हेमंत अरुण** (पृष्ठ २१)
कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान
नालासोपारा (पूर्व)
९८२२८४७१२०, ९२२०६९९९५७

**सज्जन माणूस म्हणून जन्माला येणे हा योगायोग आहे, पण सज्जन म्हणून मरणे आयुष्यभराची कमाई आहे.**

## आरोग्यं धन संपदा

मधुमेह होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपचार निसर्गोपचारामध्ये निश्चितच आहे. मधुमेह झाल्यास त्यासाठी - स्वादुपिंडाचे कार्य सशक्त करणे, तसेच शरीरातील आम्लता कमी करणे हे उद्दिष्ट समोर ठेवून उपचार केल्यास, मधुमेहामुळे होणारी हानी भरुन काढता येते व नियंत्रणही ठेवता येते. मधुमेह पूर्ण बरा करण्यासाठी खूप परिश्रम घेणे आवश्यक आहे. परंतु आत्ताच्या जीवनशैलीत हे अवघड आहे. तरीही सकाळी लवकर उठणे, व्यायाम करणे, ध्यान-प्राणायाम करणे, चालत मोकळ्या हवेत फिरायला जाणे, जिभेवर नियंत्रण ठेवणे. दूध, दही, मैदा, बेकरी पदार्थ बंद करावे. त्याएवजी सेंद्रिय गुळाचा वापर व कच्चा आहार सुरु करावा. मीठाचा वापर कमी करावा. ही सर्व पथ्ये कटाक्षाने पाळल्यास रक्तशर्करा नियंत्रित होऊन मधुमेहापासून मुक्ती मिळेल.

- वैद्य संजीवनी मराठे

Marathe Pratishthan

# "मराठे परिवार"
# कर्नाटकचे सिरवी येथील संमेलन

दुर्ग येथील अखिल भारतीय मराठे परिवार संमेलनानंतर ३ मे २०१४ रोजी हळसनकाई-सिरसी येथे अर्ध्या दिवसाचे संमेलन घेतले. निमंत्रणपत्रिकेत याला स्नेहकुट आणि महासभा असे नांव दिले होते.

या संमेलनाला त्या भागातील सुमारे १४०-१५० बंधुभगिनी उपस्थित होते. गोमंतकातील सहा प्रतिनिधींनी सहभाग घेतला. अर्थात या संमेलनात प्रौढ, युवा आणि स्त्रीया यांचे चांगलेच प्रमाण होते. जे इतर ठिकाणी दिसत नाही.

सकाळी ठरल्याप्रमाणे संमेलनाला सुरुवात झाली. श्री काळिंग गणेश यजमान यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रत्येकानी आपला परिचय करुन विषयावर संमेलनाचे अध्यक्षानी श्री. कृष्णाजी यांनी सहभागी व्यक्तीना आपापले अभिप्राय - सूचना मांडण्याचे आवाहन केले.

दुर्गचे श्री. केशव रामचंद्र, हळसितकाईचे श्री. दत्तात्रय गणेश, कारवारचे श्री. रत्नाकर बंगलोरचे श्री. संपत, श्री. गजानन रंगनाथ, गोमंतकाच्या सौ. द्रोपदा दीपक/दीपक अनंत यांनी विविध सूचना केल्या व संमेलनाविषयी अभिप्राय व्यक्त केला.

यजमानांच्या व सर्वांच्याच आतिथ्याचा अनुभवावर सर्वजण भरभरुन बोलले. ज्याचा अनुभव दुर्ग येथील संमेलनात अनेकानी घेतला होता.

कर्नाटक मराठे परिवाराला अध्यक्ष पुराणिक राम, गौरवाकर श्रीधर नारायण, केशव रामचंद्र -मर्मदर्शी सतीश माहारेव - उपाध्यक्ष, पूर्वीचे अध्यक्ष गोविंदराव यांनी आपले विचार व्यक्त केले. श्री. श्रीधर मराठे यांनी कुळवृत्तांच्या कच्या आराखड्याची माहिति दिली. श्री. केशव नरसिंह मंजुगुणि - सिरसी जे संमेलनाचे चिंतक म्हणून बोलविले होते. त्यांचे सविस्तर विवेचन संमेलनाचे दिशा दिग्दर्शन करणारे होते.

श्री. बळिराम बाळकृष्ण यांनी मराठे प्रतिष्ठानच्या शुभेच्छा दिल्या.

कुमारी हारका (दहावीत पहिली), आदित्य (ग्रामपंचायत सदस्य) आणि संमेलनाध्यक्ष कृष्णाजी यांचय हृदय सन्मान अमृतमहोत्सवानिमित्त संमेलनाचा महत्वाचा कार्यक्रम होता.

सांस्कृतिक कार्यक्रमाने (ज्यामध्ये कुमार मराठेने त्याला आईदट (सौ. संपदा) सादर केलेला भरतनाट्यम, कर्नाटक संगीत, सौ. सुप्रिया किशोर, भरतनाट्यम - कुमारी शरका, गजानन वायुसेदव यांचे गायन आणि यजमानीण सौ. कविता कांळिंग यांचे सुनअईयद गीता पठण, संमेलनाचे सूप वाचले. अर्थात त्यानंतर झालेल्या चविष्ट पर्यावरण स्नेही भोजनाने असे म्हणायला हवे. निघताना चहा-कॉफी आणि तळलेले गरे व सर्वांना खाऊ.

पुढच्या वर्षी मुंडाजे येथे परत भेटू या म्हणत सर्वांनी एकमेकाचा निरोप घेतला. दुर्ग-गोमंतक प्रतिक प्रतिनिधींनी वनवासी येथी नियोजित श्री परशुराम मंदिर बांधकामाला भेट दिली.

- काळिदास बाळकृष्ण
कार्यकारीणी सदस्य, गोवा

BOOK POST

If undelivered,
please return to

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१.

**विशेष सूचना**

**"हितगुज" राखीव फंड निधी शक्यतो चेकद्वारे "मराठे प्रतिष्ठान" या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावा. तसेच मराठे प्रतिष्ठानची सारस्वत कॉपरेटिव्ह बँक, वरळी शाखा, अकाऊंट नंबर : ०१०२००१०००२२४४८ IFSC Code : SRCB 0000010 असा आहे. येथे फंड निधी ज़मा करा. जमा केल्यास आपले नाव कळवावे.**

Marathe Pratishthan